दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –२५१ बुधवार,दि.१४ मे २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-251 Wednesday, Dt.14 May 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांची
# सुरक्षा पोलिस कमिशनर, एसपी करणार

मुंबई : आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलली आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांची सुरक्षा आता स्वतः पोलिस आयुक्त करणार आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचे अनुदान बंद केल्याची चर्चा सुरू असताना सुरक्षेचा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी राज्य सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे.

सुरक्षेसाठी विशेष समिती गठीत

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा देण्यासंदर्भात विशेष कक्ष गठीत करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य कक्ष गठीत करण्यात आला आहे. या कक्षाचे प्रमुख पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक राहतील. सोबत जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी आणि महिला बालविकास विभागाचे अधिकारी सदस्य असतील. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त अशा जोडप्यांच्या सुरक्षेचा आढावा दर तीन महिन्यांनी घेणार आहेत.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय

### शासनाचे आदेश काय?

आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षेची गरज असेल तर त्यांना तात्काळ सुरक्षा पुरविण्यात यावी.
काही काळ त्यांना राहण्यासाठी सुरक्षागृह ही प्रत्येक जिल्ह्यात तयार करण्यात यावीत.
शासकीय विश्रामगृह असेल तर त्या ठिकाणी व्यवस्था करावी.
जर शासकीय विश्रामगृह नसेल तर भाडेतत्त्वावरती घर खरेदी करून त्यांची व्यवस्था करण्यात यावी.
या जोडप्यांच्या सुरक्षेचा प्रश्न असेल तर एफआयआर नोंदवून तात्काळ सुरक्षा पुरवली जावी.
या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्यस्तरीय ११२ नंबरची हेल्पलाइन असणार.
या कक्षाच्या संदर्भात दर तीन महिन्यांनी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यासंदर्भात आढावा घेऊन अहवाल तयार करतील.






बीड जिल्ह्यात काल झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले, तसेच बीड तालुक्यातील शिदोड येथे असणाऱ्या जस्विक पोल्ट्री फार्म चे वादळी तडाख्यात प्रचंड नुकसान झाले. यात पत्रे उडाली, अंड्याचे नुकसान झाले, काही कोंबड्या दगावल्या आहेत. या फार्म ची पाहणी करतांना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, फार्म चे चालक संजय नरवडे, पंकज कुटे, राजाभाऊ हुरकुडे, गणेश थोरात.

## एकल महिलांच्या प्रश्नावर राज्य सरकार सकारात्मक :– बाजीराव ढाकणे

प्रतिनिधी @ बीड

जेष्ठ समाजसेवक हेरंब कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली साऊ एकल महिला समितीचे राज्यभरातील कार्यकर्ते मागिल पाच वर्षांपासून महाराष्ट्र राज्यातील एकल महिलांच्या विविध प्रश्नावर राज्य सरकार बरोबर पत्रव्यवहार, बैठका व निवेदनाद्वारे झगडत असुन त्या प्रत्येक गोष्टी सरकार कडून सुरू करून घेण्यात यशस्वी होत आहे असे सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे.

आज मंगळवार दिनांक १३ मे रोजी मुंबईत मंत्रालयात एकल महिलांच्या प्रश्नावर महिला व



बालकल्याण मंत्री नामदार आदितीताई तटकरे यांनी एकल महिलांच्या प्रश्नावर बैठक घेतली. या बैठकीस आमच्या साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब दादा कुलकर्णी व अभ्यासू कार्यकर्ते मिलिंदकुमार साळवे सहभागी झाले होते.

या बैठकीत एकल महिलांचे सर्वेक्षण करणे, बालसंगोपन योजनेचे पैसे दर महिन्याला नियमित मिळणे,तालुका स्तरावर या महिलांसाठी समित्या तयार करून सक्रीय करणे, एकल महिलांसाठी कमी व्याजदराची व्यक्तिगत कर्ज योजना तयार करणे असे अनेक मुद्दे मांडले. त्याला सन्माननीय मंत्री व अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्याबद्दल राज्य सरकार व संबंधित खात्याचे मंत्री आणि अधिकारी यांचे साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी आभार मानले आहेत.

## वीरशैव लिंगायत समाजाच्या गुणवंतांना यंदाही मिळणार शिष्यवृत्ती

प्रतिनिधी @ माजलगांव

### दहावी, बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा; श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आवाहन

येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या वतीने यंदाही वीरशैव लिंगायत समाजातील दहावी आणि बारावीच्या ८५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. दरम्यान, दहावी आणि बारावी परीक्षेतील यशस्वी गुणवंतांचे श्री संस्थान मठातर्फे अभिनंदन करण्यात आले आणि मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर



शिवाचार्य महाराज यांनी गुणवंतांना शुभाशीर्वाद दिले.

लिंगैक्य श्री गुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज माजलगावकर यांनी अनेक वर्षांपासून समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. यंदाही गुरूपौर्णिमेला या शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. वीरशैव लिंगायत

(उर्वरीत पान २ वर)

## ना. पंकजाताई मुंडेंचा ऐतिहासिक निर्णय

### पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या आता होणार समुपदेशनाने

प्रतिनिधी @ मुंबई

मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा व बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला आहे.



समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही दि. १५ व १६ मे २०२५ रोजी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेदरम्यान सुमारे ६५० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येणार आहेत.पशुसंवर्धन विभाग व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना केल्यानंतर काही नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यामुळे एकत्रित पशुसंवर्धन विभागांतर्गत रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे तीन हजार पेक्षा जास्त पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले असून नजिकच्या काळात सदर पदे भरली जाणे अभिप्रेत आहे.

पारदर्शक कारभार ; पसंतीनुसार बदल्या

पशुसंवर्धन विभागातील मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली

(उर्वरीत पान २ वर)

## माजलगांव येथील एका सराईत गुन्हेगाराची हर्सल कारागृहात रवानगी

प्रतिनिधी @ माजलगांव

बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री नवनीत काँवत यांनी शर्तीचे प्रयत्न चालविले आहेत.याच अनुशंगाने माजलगाव येथील तारेक मुसाखान पठाण यास एम.पी.डी.ए.अंतर्गत हर्सूल कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. बीड जिल्यातील गुंडगिरीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून एमपीडीए कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडांवर कार्यवाही करण्याचे योजले आहे. या पार्श्वभुमीवर पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस ठाणे माजलगांव शहर यांनी इसम नामे तारेकखान मुसाखान पठाण वय २८ वर्षे रा. फुलेनगर माजलगांव ता. माजलगांव जि.बीड यास एमपीडीए कायद्या अंतर्गत स्थानबध करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस अधिक्षक साहेब बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हा दंडाधिकारी बीड यांना सादर केला होता.



सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पोलीस माजलगांव शहर येथे जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, रस्त्यात आडवुन मारहाण करण, चोरी करणे, गैरकायद्याची मंडळी जमवणे अशा दखलपात्र स्वरुपाच्या ०७ गंभीर गुन्हयांची पोलीस अभिलेखावर नोंद आहे. सदरील इसमावर नमुद गुन्हे दाखल असल्याने पोलीसांची त्याचेवर करडी नजर होती. सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी बीड यांनी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एमपीडीएकायद्याअंतर्गत सदर इसमास त्यांचे कडील आदेश क्रमांक जा.क्र.२०२४/आरबी डेस्क–१/पोल–१/ एम.पी.डी.ए. ०८ / दिनांक ११/०५/२०२५ अन्वये नमुद इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबध्द करण्याचे आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक

(उर्वरीत पान २ वर)

## कु.वैष्णवी परमेश्वर सातपुतेचे दहावी बोर्ड परिक्षामध्ये सुयश



प्रतिनिधी @ बीड

शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांची मुलगी कु.वैष्णवी परमेश्वर सातपुते दहावी बोर्ड परिक्षामध्ये ९३.२० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाल्याबद्दल तीचे मनपुर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस मनपुर्वक खूप खूप शुभेच्छा..चंपावती विद्यालय बीड येथील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांचे मनपूर्वक आभार..

## भुमी अभिलेख कार्यालयाचा मनमानी कारभार

## सतत कर्मचारी अधिकारी राहतात गैरहजर

### शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवा अन्यथा टाळे ठोकणार – भाई मोहन गुंड

प्रतिनिधी @ केज

केज येथील उप विभागीय भूमी अभिलेख कार्यालया मध्ये शेतकऱ्याची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक केली जात आहे.कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी सातत्याने गैरहजर असतात.दोन ठिकाण चा चार्ज असल्याचे कारण दाखवत कार्यालयात उप अधिक्षक उपस्थित रहात नसल्यामुळे अनेक कामे रखडलेले आहेत,अशी तक्रार शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी वरिष्ठाकडे केली आहे.पेरणीचे दिवस असल्याने नंबर बांध,नकाशे,मोजणी, हद्द कायम करणे, गुंठेवारी इत्यादी शेतकऱ्यांचे कामे गेली सहा सहा महिन्यापासून रखडले आहेत.एका कामासाठी शेतकऱ्यांना वारंवार चकरा माराव्या लागतात,खाजगी दलाला मार्फत काम तात्काळ होते,वरील विषयाची चौकशी करून सतत गैरहजर राहणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा केज उप विभागीय भूमि अभिलेख कार्यालयाला शेतकरी कामगार पक्षा च्या वतीने दि.२० मे २०२५ रोजी कुलुप ठोकण्यात येईल आसे जिल्हाधिकारीकार्यालय बीड,जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय बीड यांना दिलेल्या निवेदनात भाई मोहन गुंड,ड.निखिल बचुटे,पप्पु भोसले, आप्पा गवळी,दशरथ आकुसकर,नसरीन बागवान यांनी दिला आहे.



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय

# ‘राजदूता’चे कैसे खेळणे...

‘निवृत्त कधी होणार आहात, असे कुणी विचारण्याआधीच निवृत्ती घेणे योग्य असते,’ असे उद्गार दिग्गज कसोटीपटू विजय मर्चंट यांनी क्रिकेटच्या अनुषंगाने काढले होते. असे कुणी विचारण्याआधीच विराट कोहलीने निवृत्ती जाहीर केली.

‘निवृत्त कधी होणार आहात, असे कुणी विचारण्याआधीच निवृत्ती घेणे योग्य असते,’ असे उद्गार दिग्गज कसोटीपटू विजय मर्चंट यांनी क्रिकेटच्या अनुषंगाने काढले होते. असे कुणी विचारण्याआधीच विराट कोहलीने निवृत्ती जाहीर केली. विराट म्हणजे कसोटी क्रिकेटचा राजदूत. कसोटी क्रिकेट संपले, असे मानले जात असताना चाहत्यांना मैदानाकडे खेचण्याची ताकद काही खेळाडूंत आहे, त्या यादीत विराटचे नाव वरचे. त्याचा निवृत्तीचा निर्णय मुख्यतः संघाची गरज म्हणून झालेला असावा. रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर २५ वर्षीय शुभमन गिल कर्णधार होण्याची शक्यता आहे.

अशा वेळी आपल्यासारख्या बुजुर्गाने दूर होणे चांगले, असाच विचार त्याने केला असणार; अन्यथा कसोटीतील दहा हजार धावांचा मनसबदार होण्यासाठी एक दौरा पुरेसा असतानाही त्याने हा निर्णय घेतला नसता. मर्यादित षटकांच्या लढतीपेक्षा कसोटी क्रिकेट विराटला जास्त आवडत असे. त्याची पूर्वतयारी कायम कसोटीला प्राधान्य देऊन होत असे. डोनाल्ड ब्रॅडमन, सचिन तेंडुलकर यांची फलंदाजी बघण्यासाठी जेवढी उत्सुकता असे, तेवढीच विराटला कसोटीत खेळताना बघताना ऑस्ट्रेलियातही होती. कसोटीच्या दीर्घ दिवसाच्या खेळातील काही महत्त्वाचे क्षण अनेकांना दिसत नाहीत; पण ते कायम लक्षात राहतात. ‘मी कसोटीला माझ्याकडील सर्व काही दिले आणि मला अपेक्षेपेक्षा जास्त काही मिळाले,’ ही निवृत्त होताना विराटने केलेली टिप्पणी त्याची मनोभूमिका दर्शवते.

गेल्या काही वर्षांपासून विराटला आपल्या मागील उजवी यष्टी नेमकी कुठे आहे, याचा नीटसा अंदाज येत नव्हता. ऑस्ट्रेलियात हे प्रकर्षाने जाणवले. त्याच्या देदीप्यमान कारकिर्दीतील न विसरण्याजोगा असा हा टप्पा असेल; पण त्यामुळेच त्याने कदाचित निवृत्तीचा गांभीर्याने विचार सुरू केला असेल. त्याच्या यशाने भारतीय क्रिकेटला खूप काही दिले. वयाच्या तिशीच्या उत्तरार्धातील त्याची धावा घेण्याची चपळाई अनेक नवोदितांना तंदुरुस्तीचे महत्त्व सांगणारी होती. त्याचबरोबर संघासाठी स्वतःला झोकून देण्याची त्याची वृत्ती कोण, कशी विसरेल? सन २००६मध्ये वडिलांचे निधन झाल्यानंतर, कर्नाटकविरुद्धच्या रणजी सामन्यात दिल्लीवरील फॉलोऑनची नामुष्की टाळण्यासाठी तो मैदानात उतरला.

देशांतर्गत स्पर्धेत वयाच्या १५व्या वर्षांपासून चमकणारा युवक ते ‘किंग कोहली’ हा त्याचा प्रवास भारतीय क्रिकेटच्या यशाचा, विजेतेपदाचा, वाढत्या बळाचा, वाढत जाणाऱ्या आर्थिक वर्चस्वाचा प्रवास आहे. त्याने हे सर्व साध्य केले ते कठोर मेहनतीच्या जोरावर. तो गुणवान होताच; पण त्याहीपेक्षा त्याची धावाची भूक जबरदस्त होती. कोणत्याही आव्हानास सामोरे जाताना आपण आघाडीवर असावे ही त्याची कमालीची महत्त्वाकांक्षा यशाचा मार्ग तयार करीत होती. ‘वर्ल्ड कप १९ वर्षांखालील स्पर्धे’च्या वेळी इंग्लंड, ऑस्ट्रेलियाचे खेळाडू तुच्छतेने आपल्याकडे बघत आहेत, हे लक्षात आल्यावर त्यांच्या नजरेला नजर तो देत होता आणि त्यानंतर सहकाऱ्यांना, ‘बॉस कोण आहे हे दाखवावे लागते,’ असे सांगत होता.नंतर प्रसिद्धीच्या शिखरावर गेल्यावर ती प्रसिद्धी त्याच्या डोक्यात गेली असावी, असे वाटू लागले. मात्र, ही चूक त्याला लवकर उमगली. यातून तो खूप काही शिकला. त्यामुळे सुपरस्टार झाल्यावर या वलयामागचा आपल्यातील ‘माणूस’ तर हरवणार नाही ना, अशी शंका तो बोलून दाखवत असे. इंग्लंड दौऱ्यावरील अपयशानंतर तो खूप खचला होता; पण तो त्यातून बाहेर आला आणि कसोटी क्रिकेटचा जणू चेहरा झाला. अर्थात, वाढत्या वयापासून कोणाचीच सुटका नसते. दोन मोसमापासून आपले पदलालित्य कुठेतरी हरवले आहे, आपल्या तांत्रिक उणिवा गोलंदाज सहज हेरत आहेत, त्यावर मात करण्याच्या प्रयत्नात प्रश्न बिकट होत आहे, हे विराटला कळू लागले होते. कमालीची एकाग्रता आणि धावांतील सातत्य हरपत असल्याची जाणीव त्याला सलत होती.

# रस्त्यावर राहणाऱ्या मुलांसाठी फिरते पथक योजना, समाज व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणार

रस्त्यावर राहणाऱ्या मुलांच्या पुनर्वसनासाठी ‘फिरते पथक’ ही सर्वंकष योजना राज्यात नियमित स्वरूपात राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे राज्यातील रस्त्यावर राहणाऱ्या हजारो बालकांना शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि नवजीवनाची संधी मिळणार असून ही योजना बालहक्कांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकेत प्रत्येकी एक व मुंबई महानगरपालिकेमध्ये पुर्व व पश्चिम उपनगरांसाठी प्रत्येकी एक अशी एकूण ३१ फिरती पथके सुरू करण्यात येणार असून, आगामी काळात याची व्याप्ती राज्यात वाढविण्यात येणार आहे.या योजनेचा उद्देश रस्त्यावर राहणाऱ्या, एकल, अनाथ व दुर्लक्षित बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना शिक्षणाची गोडी लावणे, वैद्यकीय सेवा पुरवणे आणि त्यांच्या सर्वांगीण पुनर्वसनासाठी आवश्यक त्या शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आहे.

सुरुवातीला मिशन वात्सल्य अंतर्गत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक अशा सहा जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर ही योजना सुरू करण्यात आली होती. याला मिळालेला सकारात्मक प्रतिसाद लक्षात घेऊन ही योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.या योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून विशेषतः बाल स्नेही बस/व्हॅनद्वारे ही सेवा दिली जाणार आहे. या व्हॅनमध्ये समुपदेशक, शिक्षक, महिला कर्मचारी, वाहनचालक व काळजीवाहक अशी चार जणांची टीम असणार असून बसमध्ये ऋझड ट्रॅकिंग व उउढत कॅमेरा देखील असणार आहे. मुलांचे सामाजिक अन्वेषण अहवाल तयार करून त्यानुसार त्यांच्या गरजांनुसार वैयक्तिक पुनर्वसन आराखडा तयार केला जाईल.

मुलांना वयाप्रमाणे अंगणवाडीत, शाळांमध्ये प्रवेश मिळवून देणे, त्यांच्या आरोग्याची तपासणी करून लसीकरण, पोषण आहार, औषधोपचार, स्वच्छतेच्या सवयी आणि व्यसनमुक्तीसाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. त्याचबरोबर त्यांना विविध कला व शिक्षणावरील उपक्रमांत गुंतवले जाणार आहे.

या योजनेंतर्गत दरमहा किमान २०% मुलांना शाळेत प्रवेश मिळवून देणे बंधनकारक आहे. योजनेंतर्गत संस्थांना त्रैमासिक निधी वितरीत केला जाणार आहे आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांकडून नियमित आढावा घेतला जाणार आहे.

नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधित ‘होम स्वीट होम’ योजनेतील घरांना अंतर्गत एक हजार रुपये मुद्रांक शुल्क

नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्यांना होम स्वीट होम अंतर्गत मौजा पुनापूर येथे वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्टा दस्त नोंदणीसाठी एक हजार रुपये मुद्रांक शुल्क आकारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. स्मार्ट सिटी प्रोजेक्टमुळे बाधित झालेल्यांना २८ घरांचे वाटप करण्यात आले आहे. या घरांसाठी दस्त नोंदणी करताना सुमारे ४० ते ४५ हजार रुपये मुद्रांक शुल्क द्यावे लागणार होते. वस्तुतः पंतप्रधान आवास योजनेतील घरांसाठी एक हजार रुपयांचे मुद्रांक शुल्क आकारण्यात आले होते. याच धर्तीवर स्मार्ट सिटी प्रोजेक्ट अंतर्गत ज्यांची घरे प्रकल्पासाठी घेतली गेली त्यांना घरांच्या नोंदणीसाठी मुद्रांक शुल्कात सवलत देण्याची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार 'होम स्वीट होम' योजनेअंतर्गत मौजा पुनापूर येथील अत्यल्प उत्पन्न गटासाठी बांधण्यात आलेल्या २८ घरांच्या भाडेपट्टयांच्या दस्तांना एक हजार रुपयांचे मुद्रांक शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला.

बांधकाम क्षेत्रात ‘एम-सँड’चा वापर अनिवार्य करण्याचे धोरण निश्चित

नैसर्गिक वाळूच्या अति उत्खननामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय संकटांना आळा बसावा, तसेच बांधकाम क्षेत्राला पर्यायी व टिकाऊ साधन उपलब्ध व्हावे, यासाठी राज्यात कृत्रिम वाळू (एम-सँड) चा उत्पादन व वापर धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणानुसार सार्वजनिक बांधकामांमध्ये या कृत्रिम वाळूचा वापर वाढावा यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

वाळूच्या उत्पादनासाठी स्वामित्वधन म्हणून प्रतिब्रास ६०० रुपये आकारण्यात येते, त्याऐवजी प्रतिब्रास २०० रुपये इतक्या सवलतीच्या दराने स्वामित्वधन (रॉयल्टी) आकारण्यास बैठकीत मंजूरी देण्यात आली. क्वॉरी वेस्ट व डोंगर उत्खननातून मिळणाऱ्या दगडांपासून क्रशरच्या सहाय्याने तयार होणारी ही कृत्रिम वाळू नैसर्गिक वाळूला पर्याय ठरू शकते, या धोरणानुसार, जिल्हा प्रशासन व वन विभागाच्या परवानगीनंतर एम-सँड युनिट्स उभारण्यास परवानगी देण्यात येणार असून, पर्यावरणीय नियमांचे पालन आवश्यक राहील.

राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय व सार्वजनिक संस्थांनी आपल्या बांधकाम प्रकल्पांमध्ये एम-सँडचा प्राधान्याने वापर करावा, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. याशिवाय, भारतीय मानक ब्युरोच्या (खड ३८३:२०१६) निकषानुसार गुणवत्ताधारित एम-सँडचाच वापर करण्यात यावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणास मंजुरी - प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती/ संस्थांना एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योगविभाग सवलती देणार आहे. तसेच एम-सँड तयार करणार्या युनिटला प्रतिब्रास २०० रुपये इतकी सवलत देण्यात येणार आहे.

एम-सँड युनिट्समुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी वाढतील, तसेच नैसर्गिक वाळूवरील अवलंबित्व कमी होऊन पर्यावरण रक्षणास हातभार लागेल, असा शासनाचा विश्वास आहे. यासाठी जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात येणार असून, धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र निरीक्षण यंत्रणा तयार केली जाणार आहे.

राज्यातील बांधकाम क्षेत्रात या निर्णयामुळे मोठा बदल होण्याची शक्यता आहे. शासनाच्या या पावलामुळे पर्यावरण रक्षण, टिकाऊ विकास आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.एम सँड गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देण्यात येणार असून औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, व्याज सवलत, विद्युत् शुल्कातून सूट, मुद्रांक शुल्क माफी आणि वीजदरात अनुदान दिले जाणार आहे.

शासकीय कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतनातील त्रुटी दूर करणारा खुल्लर समितीचा अहवाल स्वीकृत

शासकीय कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतनातील त्रूटी दूर करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या मुकेश खुल्लर समितीचा वेतनत्रुटी व अन्य शिफारशींबाबतचा अहवाल आज मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. केंद्राच्या सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात आल्या. पण सुधारित वेतनश्रेणी लागू केल्यानंतर वेतननिश्चिती व सुधारित वेतनश्रेणी यांच्या अनुषंगाने काही त्रुटी आढळल्या होत्या. त्यावर राज्यातील शिक्षकांनी मुंबई, छत्रपती संभाजीनगर व नागपूर खंडपीठांमध्ये विविध याचिका दाखल केल्या होत्या. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शासनाने १६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे मुकेश खुल्लर यांच्या अध्यक्षतेखाली वेतनत्रुटी समिती स्थापन केली होती. या समितीने विविध प्रशासकीय विभाग तसेच ५८ संघटनाशी चर्चा केली. समितीला प्राप्त तसेच वित्त विभागाकडे सादर निवेदनांचाही विचार केला. यात समितीने विविध संवर्गाचे प्रस्ताव तपासून ४४१ संवर्गांबाबत शिफारशी केल्या आहेत. या शिफारशींचा अहवाल ३१ डिसेंबर २०१४ रोजी शासनास सादर केला गेला. हा अहवाल व त्यातील शिफारशी आज मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारण्यात आल्या. अहवालात, समितीने वेतनस्तर मंजूरीबाबतचे विवरणपत्र जोडपत्र - १ म्हणून, तर जोडपत्र २ मध्ये वेतननिश्चिती, निवडश्रेणी व प्रशासकीय सुधारणांबाबत केलेल्या शिफारशी समाविष्ट आहेत. जोडपत्र - ३ मध्ये समितीने अमान्य केलेल्या प्रस्तावांचे विवरण सादर केले आहे. मुख्यतः बक्षी समितीच्या खंड - २ च्या अनुषंगाने काढलेल्या १३ फेब्रवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार वेतनश्रेणीत वाढ करूनही वेतन निश्चिती करताना काही कर्मचाऱ्यांचे नवीन वेतन पूर्वीच्या वेतनापेक्षा कमी होत असल्याचे आढळले होते. नवीन वेतन श्रेणी लागू करून वेतन पूर्वीपेक्षा कमी होत असल्याचे आढळल्यास त्या वेतनश्रेणीत पुढील टप्प्यावर वेतन निश्चित करण्याची शिफारस समितीने केली आहे. जेणेकरून नवीन वेतन श्रेणीत पूर्वीपेक्षा कमी वेतन राहणार नाही. याशिवाय निवडश्रेणी वेतनस्तर लागू करण्याच्या २८ मार्च २०२३ च्या शासन निर्णयातील एकाकी पदासाठींची वेतनश्रेणी एस-२७ पेक्षा जास्तीची अट शिथील करण्याची शिफारस समितीने केली आहे. तसेच एकाच संवर्गात पण अन्य विभागात समान पदावर काम करणाऱ्यांना सुधारित वेतन श्रेणी देण्यास समितीने शिफारस केलीआहे. वेतनश्रेणी सुधारल्याने पदोन्नतीतील साखळीतील पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी कमी होत असल्यास, ती त्रुटी दूर करण्याचीही शिफारस समितीने केली आहे. या समितीने शिफारस केलेले वेतन १ जानेवारी २०१६ पासून काल्पनिकरित्या मंजूर केले जाईल व प्रत्यक्ष आर्थिक लाभ याबाबतचे शासन आदेश ज्या महिन्यात काढण्यात येतील, त्या महिन्यापासून लागू होतील. मात्र १ जानेवारी २०१६ ते शासन आदेश काढण्यात येणाऱ्या महिन्यापर्यंतची कोणतीही थकबाकी दिली जाणार नाही.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

सार्वजनिक खासगी भागीदारीव्दारे आयटीआयमध्ये आधुनिकीकरणराज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) सार्वजनिक खासगी भागीदारी व्दारे अद्ययावतीकरण करण्याचे धोरण राबविण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या धोरणाचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रांमध्ये रुपांतरीत करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रशिक्षण केंद्रातून उद्योगांच्या मागणीनुसार प्रशिक्षणार्थी घडवणे आणि त्यांची रोजगार क्षमता वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन धोरणात्मक भागीदार म्हणून काम करणार आहे. या धोरणानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांशी भागीदारी करता येणार आहे. औद्योगिक संघटना, उद्योग किंवा त्यांचे ट्रस्ट, राज्य किंवा केंद्र सरकारचे सार्वजनिक उपक्रम, स्वयंसेवी संस्था भागीदारी करु शकतात.

भागीदारीसाठी कालावधी आणि रक्कम निश्चित करण्यात आली आहे. संस्था १० वर्षे दत्तक घेण्यासाठी किमान १० कोटी रुपये आणि २० वर्षांसाठी किमान २० कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहेत.औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे स्थान, मूल्यांकन आणि संभाव्यतेच्या आधारे तीन याद्यांमध्ये विभागले जाईल. आयटीआयच्या जागेची आणि इमारतीची मालकी शासनाकडे राहील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेबाबत शासनाची धोरणे कायम राहतील. शिक्षक कर्मचाऱ्यांसह कर्मचारी कायम राहतील. तथापि, नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण आणि अभ्यासक्रम राबविण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी भागीदार उद्योगाद्वारे नियुक्त केले जाऊ शकतात. नवीन भागीदारांना उपकरणे, साहित्य खरेदी आणि नूतनीकरण / बांधकामास परवानगी दिली जाईल. सरकारी निविदा प्रक्रियेचे पालन न करता खुल्या बाजारातून नूतनीकरण आणि बांधकाम करू शकतात.

प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये एक पर्यवेक्षण समिती (आयएमसी) नियुक्ती केली जाईल. या समितीत नवीन येणारा भागीदार अध्यक्ष असेल तर संस्थेचे प्राचार्य किंवा उपप्राचार्य किंवा शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती सचिव असेल. यासंदर्भात कोणताही वाद मिटविण्यासाठी राज्यस्तरीय संचालन समिती नियुक्त केली जाईल. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत भागीदार उद्योगाकडून शिक्षण किंवा रोजगार संबंधित कार्यक्रम वगळता इतर कोणत्याही उपक्रम अथवा कामकाजासाठी परवानगी दिली जाणार नाही.

राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या उपकेंद्रास नागपूरमध्ये जमीन

राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या नागपूर येथील उपकेंद्रास मौजे चिंचोली (ता. कामठी, जि. नागपूर) येथील २० हेक्टर २३ आर जमीन देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत गुजरातमधील गांधीनगर येथील राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठ हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे एकमेव विद्यापीठ आहे. या विद्यापीठाचे उपकेंद्र नागपूर मध्ये सुरू करण्यात येणार आहे. हे उपकेंद्र विश्वास सेल, पोलिस हेल्प सेंटर इमारत, परसोडी-सुभाषनगर, नागपूर येथील इमारतीत तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर कार्यरत करण्यात येणार आहे. या उपकेंद्रासाठी २०२५-२८ साठी केंद्रीय गृह मंत्रालयाने १२० कोटी अनुदान मंजूर केले आहे. या उपकेंद्रासाठी कायमस्वरूपी प्रांगण उपलब्ध व्हावे यासाठी चिंचोली (ता.कामठी) येथील ही जमीन देण्यात येणार आहे. या उपकेंद्राचा फायदा न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई व अधिपत्याखालील सर्व प्रादेशिक प्रयोगशाळा व लघु प्रयोगशाळांमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांना होणार आहे. तसेच न्यायाधीश, पोलीस अधिकारी, कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी तसेच सरकारी अभियोक्ता यांना होणार आहे. यातून न्यायदान प्रक्रिया अधिक गतीमान होण्यासाठी मदत होणार आहे.

# जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने अपात्र ठरवलेल्या सरपंच/ सदस्य यांना पुन्हा तात्काळ पदभार द्या-प्रा.ईश्वर मुंडे



प्रतिनिधी @ बीड

स्थानिक स्वराज्य संस्थेत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी निवडणूक दिनांका पासून एका वर्षाच्या आत आपले जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक होते.मात्र काही सरपंच व सदस्यांनी विहित कालमर्यादेत प्रमाणपत्र सादर न केल्याने जिल्हाधिकारी बीड यांनी जिल्ह्यातील अनेक सरपंच व सदस्य यांना अपात्र ठरवले होते.

राष्ट्रावादी कॉंग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे व सरपंच परिषदेचे दत्ता काकडे यांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा केल्याने महामहीम राज्यपाल यांनी दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या राजपत्रानुसार सर्व संबंधितांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक वर्षाचा वाढीव कालावधी दिलेला आहे. तरी यापूर्वी अपात्र ठरवण्यात आलेले सरपंच,सदस्य व इतर पदाधिकारी यांना पूर्ववत कार्यरत ठेवण्यासाठी नव्याने आदेश काढून अपात्र ठरवलेल्या सर्व सरपंच, सदस्यांना तात्काळ पूर्ववत पदभार द्यावा अन्यथा दि. १९ मे २०२५ पासून जिल्हाधिकारी,बीड कार्यालयासमोर सर्व सबंधितांना सोबत घेऊन आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा लेखी निवेदनाद्वारे दिनांक १३ मे २०१९ रोजी उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन शैलेश सूर्यवंशी यांना प्रत्यक्ष भेटून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे व सरपंच परिषदेचे अंबादास गुजर, बाळासाहेब गावडे तसेच बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी दिला आहे.

## पान १ वरून...

**वीरशैव लिंगायत ...**

समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी दहावी किंवा बारावीच्या परीक्षेत ८५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका आवश्यक असून सोबत आधारकार्डची प्रत येत्या दिनांक ०१ जुलै २०२५ पर्यंत प्रत्यक्षात सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या व्यवस्थापनाकडे द्यावेत, असे आवाहनही श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शिवहारआप्पा महाजन (भ्रमणध्वनी क्रमांक ८२७५८५२८९८) यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठ माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

**माजलगांव येथील....**

बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्याने त्यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनिय खबऱ्याच्या आधारे सदर स्थानबध्द इसमास दि.११ रोजी माजलगांव शहरातुन ताब्यात घेवुन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक श्री नवनीत कॉँवत, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक केरबा माकणे, पोलीस हवालदार माधव तोटेवाड, पोलीस हवालदार अभिमन्यु औताडे यांनी केली आहे. भविष्यातही गुंडगिरी करणारे व कायद्याला न जुमानणाऱ्या व्यक्ती विरुध्द चझऊ- कायद्या अंतर्गत कठोर कार्यवाही करण्याचे संकेत श्री नवनीत कॉँवत, पोलीस अधिक्षक बीड व यांनी दिले आहेत.

**ना. पंकजाताई मुंडेंचा ..**

पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा, यासाठी पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गातील प्राधान्याने भरावयाची पदे निश्चित करण्यात आली आहेत. या पदांवर बदलीने पदस्थापना करण्यासाठी बदलीपात्र अधिकाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली देण्यासाठी समुपदेशनाची कार्यपध्दती अवलंबण्यात येणार आहे. त्याव्दारे बदलीपात्र अधिकाऱ्यांना प्राधान्यक्रम व जेष्ठतेनुसार उपलब्ध पदांमधून त्यांच्या पसंतीचे ठिकाण निवडण्याची संधी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली आहे.

समुपदेशनाने बदलीची कार्यपध्दती पार पाडताना ती पारदर्शकपणे पार पाडली जाईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून यामध्ये बदलीसाठी निर्धारित करण्यात आलेली पदे, दिव्यांग, गंभीर आजार असलेले कर्मचारी, असक्षम पाल्य, विधवा किंवा परित्यक्ता असलेल्या महिला, पती-पत्नी एकत्रिकरण अशी वर्गवारी करण्यात आली आहे. बदलीपात्र अधिकाऱ्यांची वर्गवारीनिहाय जेष्ठता यादी व बदलीसाठी उपलब्ध पदे यांची यादी विभागाच्या पशुसंवर्धन संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली असून त्याची लिंक सर्व संबंधित अधिकाऱ्यांनाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर वर्गवारीतील जेष्ठ अधिकाऱ्यांस बदलीचे ठिकाण निवडण्यासाठी प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

# करवाढ रद्द करा; नगरपालिकेच्या निर्णयाला विरोध - भाजपचा मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



पूर्णा (प्रतिनिधी) -पूर्णा नगरपालिकेने अलीकडेच घरपट्टी, नळपट्टी आणि इतर करांमध्ये केलेली वाढ नागरिकांच्या संतापाला कारणीभूत ठरत आहे. वाढीव करांच्या नोटिसा घरोघरी दिल्या जात असून, शहरवासीयांनी या निर्णयाविरोधात आवाज उठवायला सुरुवात केली आहे.

नगरपालिकेकडून नियमित पाणीपुरवठा न झाल्याने नागरिक आधीच त्रस्त आहेत. पंधरा दिवसांहून अधिक काळ पाणी मिळत नाही, स्वच्छतेची अवस्था दयनीय आहे, आणि तरीदेखील पाणीपट्टीत भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. याशिवाय, नगरपालिकेच्या शाळाच नसताना शिक्षण कर, वृक्ष न लावता वृक्ष कर आणि मूलभूत सुविधांची गैरसोय असतानाही घरपट्टीत केलेली राक्षसी वाढ, नागरिकांच्या रोषाला कारण ठरत आहे.

याच पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत ही वाढ रद्द करण्याची मागणी करण्यात आली.या निवेदनावर लक्ष्मीकांत कदम, हनुशेठ अग्रवाल, अजय ठाकूर, प्रशांत कापसे, राजेश धूत, बालाजी कदम, मधुकर मुळे, गोविंदराज ठाकर, राम पुरी, नाना चिटणीस, सोमनाथ पाळसकर, ओम यादव, शेख गौस, शंकर डहाळे, प्रवीण डहाळे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी स्वाक्षऱ्या केल्या असून, मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

नागरिकांना न्याय मिळावा व करवाढ तत्काळ मागे घेण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# आर.पी हॉस्पीटल येथे आत्याधुनिक १.५ टेसला एमआरआय युनिटचे उद्घाटन

परभणी /प्रतिनिधी

परभणी येथील आर. पी. हॉस्पिटलमध्ये भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीचे औचित्य साधून अत्याधुनिक १.५ टेसला एमआरआय युनिटचे उद्घाटन माजी कुलगुरू डॉ. वेदप्रकाश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आ.डॉ.राहुल पाटील, मेडिकल कॉलेज व आर.पी. हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ.प्रमोद शिंदे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. आमिर तडवी, डॉ. दीपक कुबडे, डॉ. दैठणकर, डॉ.संतोष हारकळ,डॉ.शहाजी बोडखे,डॉ.तांबोळी, डॉ.फैज,डॉ.भीमराव कनकुटे,डॉ. बाबासाहेब गायकवाड,राहुल कांबळे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.वेदप्रकाश पाटील म्हणाले,सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात चठख सुविधा १.५ टेसला चठख मशीन हे अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान असून, यामुळे मेंदू, मणक्याचे आजार, सांधे, मांसपेशी आणि अवयवांशी संबंधित आजारांचे अचूक निदान शक्य होणार आहे.

आ.डॉ.पाटील म्हणाले,जनतेला आधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे हे माझे प्रथम प्राधान्य आहे.१.५ टेसला चठख आणि ट्रॉमा केअर युनिटच्या माध्यमातून रुग्णांना तातडीने आणि अचूक उपचार



मिळतील.यावेळी स्वप्नील बोर्डे,गोपाळ सुकरे, अतुल लोंढे आणि शिवाजी जाधव यांनी परिश्रम घेतले.

५० टक्के सुट मिळणार

आर.पी.हॉस्पिटलचे अधिष्ठता डॉ.प्रमोद शिंदे यांनी सांगितले की सर्वसामान्य रुग्णांना परभणी शहरापेक्षा ५०% अत्यल्प दरात रुपये २४०० पासून उपलब्ध होणार असल्याने परभणी व परिसरातील रुग्णांनी नाव नोंदणी करावी. तसेच परिसरातील नागरिकांना मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. ही सेवा गंभीर रुग्णांसाठी वरदान ठरणार आहे,आर.पी हॉस्पिटल येथे अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणे, तज्ज्ञ डॉक्टर्स आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध आहेत.

# शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचालित शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयाची दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम

## शाळेचा शेकडा ९४.३३% टक्के निकाल!

प्रतिनिधी @ बीड

बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाने दहावी परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान विद्यार्थीनीने मिळवला आहे. कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण मिळवून द्वितीय आणि शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल आज मंगळवार दिनांक १३ मे रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाइन जाहीर झाला. या परीक्षेमध्ये बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा शेकडा ९४.३३ टक्के इतका लागला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी





शाळेने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली. यावर्षी दहावीच्या परीक्षेसाठी शाळेतून एकूण ५८ परीक्षार्थी परीक्षेस बसले होते. त्या पैकी ५५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या ५५ पैकी ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यामुळे शाळेचा शेकडा ९४.५४% टक्के निकाल लागला आहे. यामध्ये कु. अनुष्का धुमाळ हिने ९४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर चि. प्रथमेश काकडे याने ९१.०० गुण मिळवून द्वितीय आणि चि. शरद शेंडगे याने ९०.८० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे.

कु. सपना शिंदे हिने ९०.२० गुण मिळवून चौथा क्रमांक चि. जैद सय्यद ९०.०० गुण घेत पाचवा क्रमांक मिळविला तर कु. शुभांगी सोलनकर हिने ८९.६० गुण घेत सहावा क्रमांक मिळवला आहे. दहावी परीक्षेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा तथा जेष्ठ मार्गदर्शिका सौ. सुदामतीताई वाघ मॅडम, संस्थापक सचिव तथा जेष्ठ मार्ग दर्शक श्री. गोविंदराव वाघ साहेब, संस्थेचे अध्यक्ष श्री. गणेश वाघ सर , सचिव श्री. नामदेवराव वाघ सर यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर, श्री. आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम गणेश श्री गुजर सर यांच्यासह शिक्षक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, शिदोड येथील शिक्षण प्रेमी नागरिक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# हुतात्मा पानसरे हायस्कूलची विद्यार्थिनी कु. अन्वी आबासाहेब पाटील तालुक्यात सर्वप्रथम

## हुतात्मा पानसरे हायस्कूलचे शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उज्वल यश

धर्माबाद( अशोक पडोळे) मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत हुतात्मा पानसरे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळवले. उत्कृष्ट निकालाची परंपरा याही वर्षी जोपासली. धर्माबाद तालुक्यातून प्रथम येण्याचा मान पाटील अन्वी डॉ. आबासाहेब ९९ टक्के हिने मिळवला आहे. दुसरा बुन्नोड मोहन साईनाथ ९८.४ तिसरा मुंडकर साक्षी बालाजी ९६.४ हिने मिळवला आहे. मार्च २०२५ ला ४३५ विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यापैकी ४०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ९० टक्क्या पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण विद्यार्थी २७ आहेत. ८० ते ८९ टक्के गुण घेणारे विद्यार्थी ५८ आहेत. ७५ ते ७९ टक्के गुण घेणारे विद्यार्थी ३७ आहेत. प्रथम श्रेणी १४२. द्वितीय






श्रेणी १०९. उत्तीर्ण ३३ आहेत. शाळेचा एकूण निकाल----- ९३.३३%-------- लागला असून या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे विश्वस्त मंडळ, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष रामचंद्र पाटील बनाळीकर, सचिव एडवोकेट विश्वनाथ पाटील बनाळीकर, संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी व सर्व संचालक मंडळ, शाळेचे मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर, उपमुख्याध्यापक आर जी गायकवाड पर्यवेक्षक एम व्ही पुलकंठवार, एन एस जिंदमवार, शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# इरा पब्लिक स्कूलच्या यशाची परंपरा कायम दहावीचा शंभर टक्के निकाल

प्रतिनिधी @ गेवराई

दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल लागला असून यामध्ये गेवराई शहरातील इरा पब्लिक स्कूलने शंभर टक्के निकालाची आपली परंपरा कायम ठेवली आहे. यामध्ये घनश्याम ढाकणे हा विद्यार्थी शाळेतून प्रथम आला आहे. फेब्रुवारी – मार्च मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल १३ मे रोजी ऑनलाईन लागला आहे. यामध्ये गेवराई शहरातील इरा पब्लिक स्कूल न्ड जुनियर कॉलेजने आपल्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यामध्ये प्रथम – घनश्याम गणेश ढाकणे (९४.६०) , समृद्धी विजय

राजूरकर (९४.४०), तृतीय – सृष्टी प्रदिप मोटे (९२) क्रमांक मिळवला आहे. या शिवाय ५२ विद्यार्थ्यां पैकी ४० विद्यार्थी ८० टक्क्या पेक्षा जास्त गुण घेऊन उतीर्ण झाले आहे. इतर विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उतीर्ण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे इरा चे अध्यक्ष गणेश क्षीरसागर, प्राचार्या वर्षा क्षीरसागर, अश्विनी कुलकर्णी, वर्ग शिक्षक नानासाहेब कडू, दिपाली जोशी, वैशाली कापसे, मनिषा शिंदे, लक्ष्मीकांत सराफ, पठाण सुमैय्या, हरबट सर यांच्या सह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# सलग दुसऱ्या वर्षीही शाळेचा १००% निकाल कायम मुलींची बाजी

अशोक पडोळे @ धर्माबाद

## एस एस सी बोर्ड परीक्षा २०२४/२५ परीक्षेत रेणुका विश्वंभर कदम– राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर शाळेत प्रथम

राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, धर्माबाद या नामांकित शाळेने सलग दुसऱ्या वर्षी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेत १००% निकाल देत यशाची परंपरा कायम राखली आहे. या यशामध्ये रेणुका कदम या विद्यार्थिनीने विशेष उल्लेखनीय कामगिरी करत (९५.४०%) गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर श्रुतिका साहेबराव गादगे हिने (९४.६०%) गुण मिळवून द्वितीय क्रमांक, आणि अनुष्का महादेव कागेरू हिने (९३.८०%) गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. पहिल्या तीन क्रमांकांमध्ये मुलींनी बाजी मारली आहे.

राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर इंग्रजी माध्यम शाळेचे नाव तालुक्यात उजळले आहे. यंदा




बोर्डाच्या परीक्षेत एकूण ५४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, त्यापैकी १२% विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले. २७ विद्यार्थ्यांना ८०% पेक्षा जास्त, १३ विद्यार्थ्यांना ७०% पेक्षा जास्त, आणि २ विद्यार्थ्यांना ६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले. सर्व ५४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन शाळेने एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे सखोल मार्गदर्शन, अभ्यासक्रमाचे प्रभावी नियोजन, वेळेवर घेतलेले सराव परीक्षापत्र, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. पेढे वाटून आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. हे अभिनंदन केवळ यशाचे नव्हते, तर विद्यार्थ्यांच्या कष्टांचे व पालकांच्या विश्वासाचेही प्रतीक होते.

व्यवस्थापनाची भूमिका : शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुबोधजी काकाणी यांनी सांगितले की, हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नाही, तर हे संपूर्ण शाळेच्या शिस्तप्रिय वातावरणाचे, शिक्षकांच्या समर्पणाचे आणि पालकांच्या सहकार्याचे फलित आहे. आमचा उद्देश केवळ शैक्षणिक यश मिळवणे नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे.

प्रोत्साहन उपक्रम : राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर शाळेच्या वतीने २०२१–२२ पासून दरवर्षी दहावी परीक्षेत धर्माबाद तालुक्यात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला जातो.तालुक्यातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यासाठी ११,०००, द्वितीय क्रमांकासाठी ७,५००, आणि तृतीय क्रमांकासाठी ५,००० अशी रोख पारितोषिके दिली जातात. या बक्षीस वितरणाचा समारंभ १५ ऑगस्ट रोजी शाळेत आयोजित केला जातो.या निकालाच्या निमित्ताने राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर शाळेच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा ठळक नोंद झाली असून संपूर्ण धर्माबाद परिसरात या यशाचे भरभरून कौतुक होत आहे.

## मुख्यमंत्री सचिवालय (जनसंपर्क कक्ष)
## (मंगळवार, दि. १३ मे २०२५)
## मंत्रिमंडळ निर्णय – ६ (संक्षिप्त)

१) रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजनेस मान्यता. २९ महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ३१ मोबाईल व्हॅन, यासाठी सुमारे ८ कोटी मंजूर. (महिला व बालविकास विभाग)

२) नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना 'होम स्वीट होम' अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजास मुद्रांक शुल्क कमी करुन केवळ एक हजार रुपये आकारणार. (महसूल विभाग )

३) कृत्रिम वाळू (एम–सँड) धोरणास मंजुरी – प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती/ संस्थांना एम–सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योगविभाग सवलती देणार, एम–सँड तयार करणार्या युनिटला २०० रुपये प्रतिब्रास इतकी सवलत देणार. पर्यावरणाची हानी टळणार. (महसूल विभाग)

४) राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल स्वीकृत. ८० कोटींचा भार राज्य सरकार स्वीकारणार. (वित्त विभाग)

५) राज्यातील शासकीय आयटीआयचे सार्वजनिक–खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरण – आयटीआयला जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात रुपांतरित करणे हा मुख्य हेतू, उद्योग आणि आयटीआयच्या समन्वयातून रोजगारक्षमता वाढणार, प्रॅक्टिकल लर्निंग आणि अप्लाईड लर्निंगचे उद्देश साध्य होणार. (कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग)

६) राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातील उपकेंद्रासाठी चिंचोली (ता. कामठी) जिल्हा नागपूर येथील २०.३३ हेक्टर आर जागा देण्याचा निर्णय (महसूल विभाग)

# श्री छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल९४.२३%


प्रतिनिधी @ बीड

शहरातील नामांकित शाळा श्री छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालय शाळेचा निकाल ९४.२३% लागला असून त्यात विशेष प्राविण्य सह उत्तीर्ण होणारे एकूण ६० विद्यार्थी, तर प्रथम श्रेणीत २७ विद्यार्थी,आणि द्वितीय श्रेणीत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेतील एकूण निकालात याही वर्षी मुलींनी सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला. शाळेचा एकूण निकाल याप्रमाणे आहे. १) कु .खोटे राजनंदिनी शिवराम ९४.८०% २) कु .चव्हाण तेजस्विनी सिद्धेश्वर ९४.२०% ३)चि.मुसळे सचिन आत्माराम ९३.८०% ४)चि. कोरडे ओम रामेश्वर ९३.२०% ५)चि. राऊत अजय शंकर ९२.९०% ६)कु. वरपे सिद्धी आसाराम ९१.२०% ७)चि. राऊत अभय शंकर ९०.६०% ८)चि. उफाडे अभिराज विकास ९०.४०% ९)चि. साबळे हर्षवर्धन गंगाधर ९०.४०% १०) कु. खांडेकर मनाली बाळू ९०.००% ११) चि. दामुर्डे दक्ष शाम ९०.००% १२) चि. राठोड सुरज रोहिदास ८९.४०% १३) कु. वाणी श्वेता श्रीराम ८९.४०% १४) चि. चव्हाण अश्वित रमेश ८९.४०% १५) चि. पैठणे अस्मित पांडुरंग ८९.००% सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा. श्री आगळे साहेब ,संस्थेचे सचिव मा. श्री अजय जाहेर पाटील साहेब, संस्थेचे कोषाध्यक्ष श्री गोरकर साहेब, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक सुनील राऊतमारे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी हार्दिक हार्दिक

# दहावी परिक्षेत मोहमद अनसचे यश

प्रतिनिधी @ बीड

शहरातील मोहम्मद अनस खान याने इयत्ता १० वी बोर्ड परिक्षेत ८८ टक्के गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले. या बद्दल त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मार्च मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० बोर्ड परीक्षेचा मंगळवारी (दि.१३) बोर्डाने ऑनलाईन निकाल जाहीर केला. यामध्ये शहरातील बार्शी नाका भागातील पिप्लस सेमी इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी मोहम्मद अनस खालेद खान याने परीक्षेत ८८ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन



केले आहे. या यशाबद्दल मोहम्मद अनस खान याचे कुटुंब, नातेवाईक, मित्र परिवार व शिक्षकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# अलहुदा उर्दू हायस्कूल, बीडचा दहावीचा निकाल उज्वल

## काझी नुमान ९३.४० टक्के गुणांसह शाळेत प्रथम
## ६ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुणांसह बाजी मारली

प्रतिनिधी @ बीड

नूर एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, बीड द्वारा संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड या शाळेने यंदाच्या इ. १० वी (एस.एस.सी. बोर्ड) परीक्षेत आपली शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. यावर्षी शाळेचा एकूण निकाल ९८.१४ टक्के लागला असून, पुर्ण निकाल संपूर्ण बीड शहरातील शैक्षणिक संस्थांमध्ये विशेष गौरवाचा विषय ठरत आहे.

शाळेतील एकूण ५४ विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला, त्यापैकी ५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, यातील बहुतांश विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य (डिस्टिंक्शन) व प्रथम श्रेणीत यश मिळवले आहे. यामध्ये काझी नुमान काझी शाहिद याने ९३.४० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. दुसऱ्या क्रमांकावर खान मसीरा रफिक (९३%), तर तिसऱ्या क्रमांकावर पिरजादे तहुरा शुऐब आलम (९२.८०%) ही विद्यार्थिनी राहिली.

या विद्यार्थ्यांखेरीज पुढील विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट स्थान मिळवले

पठाण समीन गोहर अली खान – ९२% ,खान सारीना इफ्फत असगरउल्लाह खान – ९०.४०% , सय्यद उमर फारूक मोहम्मद नदीम – ९०.२०% वरील सहा विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

विशेष प्राविण्य प्राप्त २९ विद्यार्थ्यांमध्ये पुढील विद्यार्थ्यांचा समावेश आहे:

सय्यद आफिया अनम अकबरूद्दीन (८९.८०%), शेख मुस्तफा इनामदार मुशीर इनामदार (८९.४०%),




शेख रश्दा जियाउद्दीन (८८.८०%), खान महविश परवेझ खान (८८.२०%), शेख सबा फातिमा शेख अन्सर (८७.८०%), मोमिन अस्फिया फातिमा रऊफ सौदागर (८७.४०%), शेख दरख्शां फातिमा मुजफ्फर अली (८७.४०%), शेख साइना दरफशां नवाझूल हक (८७%), सय्यदा तहुरा सय्यद जलील (८४.२०%), अक्सा नाझ सय्यद अनीस (८४%), शेख अल्विरा जाबेर (८३%), शेख जोहा फातिमा मजहर (८२.६०%), शेख उशना अदीन मोहम्मद युनुस (८२.२०%), शेख इकरा जमीर (८२.२०%), शेख तकी यकजान शेख रफिक (८१%), शेख इकरा हुसेन (८१%), शेख कुर्रतुलऐन फारूक (७९.८०%), बेग ज़ेबा अर्शिन नय्यर (७८.८०%), शेख मसीरा शाकेर (७८.२०%), खान आयेशा अतहर खान (७६.८०%), बारेका सदफ काझी गौस (७६.२०%), इनामदार मदीहा मरियम अशफाक अहमद (७५.८०%), दुर्रानी अब्दुल्ला खान शफा मोहम्मद खान (७५.८०%) आदिंचा समावेश आहे.

निकालाचा आढावा: ९०% पेक्षा जास्त गुण मिळवलेले विद्यार्थी: ६ , डिस्टिंक्शन प्राप्त विद्यार्थी: २९ ,प्रथम श्रेणी: १८ ,द्वितीय श्रेणी: ६ ,एकूण विद्यार्थ्यांची संख्या: ५४ ,उत्तीर्ण झालेले विद्यार्थी: ५३ ,या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना नूर एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष सय्यद शफीक हाशमी, सचिव उबैदुल्ला खान, शाळेचे मुख्याध्यापक डॉ. सिराज खान आरज़ू तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेच्या या सातत्यपूर्ण गुणवत्तेमुळे पालकवर्गातून समाधान व अभिमान व्यक्त केला जात आहे.

# दहावी परीक्षेत जुनैरा अंबर वअलिना मतीन शेखचे यश



प्रतिनिधी @ बीड

दहावी च्या बोर्ड परीक्षेचा निकाल मंगळवार (दि.१३) रोजी जाहीर झाला.या परीक्षेत बीड येथील जुनैरा अंबर व अलिना मतींन शेख यांनी अनुक्रमे ९० टक्के व ८५ टक्के गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. जुनैरा अंबर शकील शेख व अलिना मतींन शेख यांचे या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.विद्यार्थी दशेतील महत्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार (दि.१३) रोजी दुपारी १ वाजता जाहीर झाला.या परीक्षेत बीड शहरातील सर पीपल्स एजुकेशन उर्दू शाळेच्या या विद्यार्थिनी असून शाळेत पहिल्या १० मध्ये येण्यासाब बहुमान या दोन्ही मुलींनी मिळविला आहे.महाराष्ट्र राज्य जीवनोत्ती विभागाचे बीड जिल्हा व्यवस्थापक शेख शकील यांची जुनैरा अंबर ही कन्या आहे तर अलिना फतेमा ही भाचची आहे. याच्या यशाबाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## चि. सार्थक जोशी एसएससी बोर्ड परीक्षेत ९४.२०% मार्क घेऊन उत्तीर्ण

प्रतिनिधी @ बीड

बीड येथील सूर्यकांत प्रभाकरराव जोशी यांचा मुलगा सार्थक हा नुकत्याच जाहीर झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेमध्ये ९४.२०% मार्क घेऊन उत्तीर्ण झाला आहे. चि.सार्थक जोशी हा संस्कार विद्यालयाचा विद्यार्थी आहे त्याच्या या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक वृंद वडील सूर्यकांत जोशी आई सौ अश्विनी जोशी सह नातेवाईक यांनी त्याचे अभिनंदन केले सार्थक जोशी हा एडवोकेट विलास जोशी यांचा पुतण्या आहे




# जालना जिल्हा परिषद समोरील उपोषण लेखी आश्वासनानंतर तात्पुरते स्थगित

प्रतिनिधी @ जालना

जिल्हा परिषद जालना कार्यालयासमोर मौजे आष्टी ग्रामपंचायत मधील झालेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात दि.१ मे पासून सुरू केले आमरण उपोषण जिल्हा परिषद प्रशासनाने दखल घेतली उपोषण स्थळी जिल्हा परिषद चे उघडे, यांनी स्वतः व इतर त्याचे सहकारी यांनी उपोषण कर्त्याची भेट घेऊन उपोषण कर्त्याशी चर्चा करुन लेखी स्वरूपात पत्र देऊन बारा तेरा दिवसांपासून भगवान रंगनाथ वाघमारे यांचे चालू असलेले आमरण उपोषण दि.१३ मे २०२५ मंगळवार रोजी जिल्हा परिषद चे उघडे यांनी लेखी आश्वासन दिल्यामुळे चालू असलेले आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे

# शेतीला जोडव्यवसाय योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा-दत्ता वाकसे



बीड (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यासह बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सुशिक्षित व बेरोजगार युवकासह पशुपालक व शेतकरी बांधवाना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध व्हावे. आणि त्यांना शाश्वत अर्थाजनाचा पर्याय उपलब्ध करून देत पशुसंवर्धन विभागाने विविध योजना उपक्रमांद्वारे ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र गतिमान ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. त्यासाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. करीता आपण पशुसंवर्धन विभागांतर्गत विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन .मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केले आहे. व विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पशुपालक, शेतकरी बांधवांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी कटिबध्द असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत प्रक्रिया अधिक पारदर्शक करणेसाठी राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेमध्ये गेली सात वर्षे ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेव लाभार्थी निवड करण्याची पध्दत सुरू करण्यात आली आहे. सन २०२१-२२ पासून जिल्हास्तरीय पशुसंवर्धन विषयक विविध योजनांसाठी सुद्धा सदर संगणक प्रणालीलागू करण्यात आली आहे. नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई- म्हशींचे गट वाटप करणे, शेळी-मेंढी गट वाटप करणे, १००० मांसल कुक्कुट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५ तलंगा गट वाटप या योजनांसाठी ऑनलाईन पध्दतीने लाभार्थी निवड प्रक्रिया सन २०२५-२६ या वर्षात दोन मे पासून सुरवात करण्यात आली आहे. तर ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख दोन जुन आहे, तरी लाभधारकांनी आपल्या अर्जाचा भरणा ऑनलाईन पद्धतीने मुदतीच्या आतच करावा असे आवाहन सुद्धा मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केले आहे.

पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे. त्याची निवड करण्यची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील पशुपालक, शेतकरी बांधव, सुशिक्षीत बेरोजगार युवक, युवती व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करण्याचे आवाहन मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी प्रसिद्धी केले आहे



# एकल महिलांच्या प्रश्नां वर राज्य सरकार सकारात्मक - बाजीराव ढाकणे

प्रतिनिधी @ बीड

जेष्ठ समाजसेवक हेरंब कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली साऊ एकल महिला समितीचे राज्यभरातील कार्यकर्ते मागील पाच वर्षांपासून महाराष्ट्र राज्यातील एकल महिलांच्या विविध प्रश्नावर राज्य सरकार बरोबर पत्र व्यवहार,बैठका व निवेदनाद्वारे झगडत असुन त्या प्रत्येक गोष्टी सरकार कडून सुरू करून घेण्यात यशस्वी होत आहे असे सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे.मंगळवार दिनांक १३ मे रोजी मुंबई येथे मंत्रालयात एकल महिलांच्या प्रश्नावर महिला व बालकल्याण मंत्री ना. आदितीताई तटकरे यांनी एकल महिलांच्या प्रश्नावर बैठक घेतली. या बैठकीस साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब दादा कुलकर्णी व अभ्यासू कार्यकर्ते मिलिंदकुमार साळवे सहभागी झाले होते.

या बैठकीत एकल महिलांचे सर्वेक्षण करणे बालसंगोपन योजनेचे पैसे दर महिन्याला नियमितमिळणे,तालुका स्तरावर या महिलांसाठी समित्या तयार करून सक्रीय करणे,एकल महिलांसाठी कमी व्याजदराची व्यक्तिगत कर्ज योजना तयार करणे असे अनेक मुद्दे मांडले.त्याला सन्माननीय मंत्री व अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.त्याबद्दल राज्य सरकार,संबंधित खात्याचे मंत्री आणि अधिकारी यांचे साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी आभार मानले आहेत.

# शरयू गोंटे चा सह्याद्री कोचिंग क्लासमध्ये सत्कार

प्रतिनिधी @ अंबड



दि.१३ मंगळवार रोजी शहरातील मत्स्योदरी विद्यालयातील विद्यार्थीनी शरयू गोंटे हिने दहावी मध्ये ९१.२० टक्के गुण मिळवित घवघवीत यश संपादन केल्याबद्दल नूतन वसाहत येथील सह्याद्री कोचिंग क्लासेसच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सह्याद्री कोचिंग क्लासचे संचालक संजय जाधव, सारिका खांडरे, बाबासाहेब जाधव, अर्जुन तायडे, किरण फोकेसह आदीची उपस्थिती होती. शरयू गोंटे हिने मिळविलेल्या घवघवीत यशाबद्दल तिचे माजी आरोग्य मंत्री व मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेश टोपे, सचिव मनीषाताई टोपे, बाळासाहेब गोंटे, शिवाजीराव गोंटे, शिवाजी तांगडे, राजेश बुरकुल,अविनाश लोखंडे सह आदींनी अभिनंदन करत भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

अंबड शहरातील सह्याद्री कोचिंग क्लासेसच्या वतीने दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांनी शरयू गोंटे हिचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार सह्याद्री कोचिंग क्लासेसचे संचालक संजय जाधव, सारिका खांडरे, बाबासाहेब जाधव, अर्जुन तायडे,किरण फोकेसह आदी उपस्थित होते

# बीड जिल्हा माहेश्वरी सभा आणि महेश सेवा संघ , बीड यांच्या वतीने जिल्ह्यातील सर्व तालुक्यात एकाच वेळी सर्व्हायकल व्हॅक्सीणेशन कार्यक्रमाचे आयोजन संपन्न

प्रतिनिधी @ बीड

कॅन्सर सारख्या भयावह आजाराची व्याप्ती जगभरात वाढत असतांना तसेच या आजारामुळे मानसिक , शारीरिक , आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याने व गर्भाशयाच्या कॅन्सर ने जगभरात वाढणारे महिला रुग्ण याचा विचार करून आरोग्य संघटनेने उर्शीरिरिल नावाची सुरक्षित लस काढली असून ९ वर्षे ते २६ वर्षा पर्यंतच्या मुली व मुलाना ही लस दिल्यास भविष्यात योनी मार्गाद्वारे होणारे कॅन्सर रोकता येऊ शकतात. जगभरात व भारतात या लसची गरज व आवश्यकता तसेच सुरक्षितता पाहून मागणी वाढत आहे .

बीड शहरात ३३ वर्षापासून माहेश्वरी , राजस्थानी समाजात कार्य करणाऱ्या महेश सेवा संघ ने याची आवश्यकता ओळखून आपल्या समाजातील मुलामुलींना या लसीकरणाचा उपक्रम आयोजित केला होता . वयानुसार २ किंवा ३ डोस याचे घ्यावे लागतात. या उपक्रमाची दखल महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा व अखिल भारतीय माहेश्वरी सभा यांनी घेऊन संपूर्ण भारतात हा व्हॅकसिणेशन कार्यक्रम राबवावा असे सूचित केले होते तसेच माहेश्वरी समाजातील आरोग्य सेवेसाठी कार्य करणार्या श्री. बांगड माहेश्वरी मेडिकल ट्रस्ट ने या उपक्रमासाठी (लस साठी )लागणारा अर्धा खर्च देण्याची तयारी दाखवली त्यामुळे संपूर्ण भारतात माहेश्वरी परिवारात हा उपक्रम चालू आहे .

बीड जिल्ह्यात ही बीड जिल्हा माहेश्वरी सभा , बीड जिल्हा माहेश्वरी महिला संघटन , तहसील सभा यांच्या सोबत महेश सेवा संघ मिळून संपूर्ण जिल्ह्यात एकाच वेळी हा लसीकरण उपक्रम काल राबवला गेला. बीड , अंबाजोगाई , केज , परळी , माजलगाव , गेवराई या सहा तालुक्यात तेथील तहसील सभा , समाजातील डॉक्टर्स , त्यांचा स्टाफ , युवा व महिला संघटना व महेश सेवा संघाच्या सदस्यांनी जाऊन लसीकरण पूर्ण केले . जवळपास २५० मुला- मुलींनी यात नावनोंदणी केली होती.

या व्हॅकसिनेशन चा पहिला टप्पा ११ मे रोजी पूर्ण झाला असून दुसरा टप्पा १७ जुलै तर तिसरा टप्पा १६ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थिती त आणि स्थानिक तहसील सभेच्या मार्गदर्शनात हा उपक्रम पार पडणार आहे . या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश सेवा संघाचे अध्यक्ष संतोष सारडा सचिव संजय सोहनी प्रोजेक्ट प्रमुख डॉ. संकेत बाहेती , किशोरकुमार बाहेती , प्रदीप मालपाणी , तहसील अध्यक्ष पंकज भुतडा , दत्तप्रसाद लोहिया , मनीष जाजू , उमेश जेथलिया , डॉ. ओमप्रकाश भुतडा , जयपाल लाहोटी यांच्यासह सर्व टीम ने सहकार्य केले. जिल्हा अध्यक्ष ऍड. श्रीकृष्ण तोष्णीवाल , सचिव जगदीश जाजू , महिला जिल्हा अध्यक्षा सौ. पूनम जाजू , सचिव डॉ. सौ. रश्मी नावंदर. बांगड माहेश्वरी मेडिकल ट्रस्ट चे सदस्य श्री. सत्यनारायण लाहोटी , सि. ए. सुरेशचंद्र लड्डा , सि. ए. गोपाल कासट , ऍड. जयप्रकाश कलंत्री या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# साई मॉडर्न इंग्लिश स्कूल बदनापूर येथे उन्हाळी क्रिडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी @ बदनापुर

साई समर्थ बहुउद्देशीय संस्था व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जालना यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्हा क्रीडाधिकारी श्री.संजय गाढवे सर यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने साई मॉडर्न इंग्लिश स्कूल येथे उन्हाळी क्रिडा प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन करण्यात आले आहे. उन्हाळी क्रिडा शिबिराचे उद्घाटन तालुका क्रिडा समन्वयक श्री. यशवंत जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी निवृत्त पोलीस निरीक्षक श्री. बळीराम गिते, साई समर्थ बहुउद्देशीय संस्था अकोला च्या सचिव सौ. सूनिताताई बळिराम गिते , साईबाबा माध्यमिक विद्यालय अकोला चे मुख्याध्यापक श्री. गजानन डोईफोडे सर, शिक्षक श्री. जंगाळे सर, श्री. सानप सर , साई मॉडर्न इंग्लिश स्कूल च्या उपमुख्याध्यापिका आफरिन मॅडम , शिक्षक श्री. विष्णू सोनवणे सर, क्रीडा मार्गदर्शक श्री दिनेश जायभाये सर यांची उपस्थिती होती .

शिबिराचा कालावधी १२ मे ते २० मे आहे. शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्रातील स्वारस्य वाढवणे, शारीरिक आणि मानसिक विकास करणे, विविध खेळांचे प्रशिक्षण देणे आहे.विविध क्रीडा प्रकारांचे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण या शिबिरात देण्यात येणार आहे. या शिबिरात मुला-मुलींसाठी विविध क्रीडा प्रकारांचे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले जाईल, तसेच त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावर भर दिला जाईल. या



शिबिराच्या माध्यमातून खेळांमध्ये स्वारस्य असलेल्या मुला-मुलींना योग्य मार्गदर्शन मिळेल, ज्यामुळे त्यांना क्रीडा क्षेत्रात प्रगती करता येईल. शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध खेळांची जसे की गोळाफेक, व्हॉलीबॉल, कबड्डी, खोखो, बास्केट बॉल ची माहिती आणि प्रशिक्षण मिळेल, तसेच सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र सुद्धा मिळेल. या शिबिरात जवळपास १०० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला आहे.तरी जास्तीत विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. बळिराम गिते यांच्याकडून करण्यात आले आहे.

# सैनिकी विद्यालयाचा १० वी चा ९८.७९ % निकालगौरव जाधवर ९६.२० टक्के गुणांसह सर्वप्रथम

प्रतिनिधी @ बीड

नवगण शिक्षण संस्था राजुरी ( न.) संचलित सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा १० वी बोर्ड परिक्षेचा निकाल ९८.७९ % लागला असून गौरव शिवाजी जाधवर हा विद्यार्थी ९६.२० % गुणांसह प्रथम आला आहे, अशी माहिती सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री. सचिन पवार सर यांनी दिली आहे. सैनिकी विद्यालय खुली तुकडी व आदिवासी तुकडीचे एकूण ८३ विद्यार्थी १० वी बोर्ड परिक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ८२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ७४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे. ०६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ०२ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीमध्ये पास झाले आहेत. गौरव शिवाजी जाधवर हा विद्यार्थी ९६.२० % गुणांसह प्रथम आला आहे. मांडवे हरिओम हनुमान ( ९४.८० % ) याने दुसरा तर सोनवणे प्रथमेश पंजाब ( ९४.६० % ) याने तृतीय क्रमांक पटकावला आहे. सदरील तीनही राज्यस्तरीय खो खो खेळाडू असून त्यांना प्रत्येकी वाढीव १० गुण मिळाले आहेत . सैनिकी विद्यालयाने निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे.

नवगण शिक्षण संस्था राजुरी ( न.) संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर , संस्था प्रमुख डॉ. दीपाताई क्षीरसागर , संस्थेचे मार्गदर्शक डॉ. योगेशभैय्या क्षीरसागर , डॉ. सारिकाताई





क्षीरसागर यांच्यासह संस्था प्रशासकीय अधिकारी डॉ. व्ही.टी. देशमाने सर , डॉ. प्रा. सुधाकर गुट्टे सर व प्राचार्य श्री. सचिन पवार सर तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# आईला मदत करत पोरीने मिळवले ९२ टक्के

प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावीचा निकाल जाहीर केला आहे. मंगळवारी १३ मे रोजी दहावीचा निकाल जाहीर झाला आहे. राज्यात दहावीचा निकाल दुपारी १ वाजता लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. पाटोद्यातील देविका जाधव हिने दहावीच्या परिक्षेत कौतुकास्पद कामगिरी केली आहे.



पाटोद्यातील देविका जाधव हिला दहावीत ९२ टक्के गुण मिळाले आहेत. देविका ने दहावीच्या परिक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. त्यामुळे प्रियदर्शनी विद्यालयात देविकाचे कौतुक होत आहे. दहावीच्या परिक्षेत १०० पैकी ९२ गुण मिळाल्याने पाटोद्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. देविका ला दहावीत मिळाल्या यशामुळे तिच्या कुटुंबाला खूप आनंद झाला आहे.

विशेष म्हणजे देविकाच्या आईचे समर्थ गारमेंट्स या नावाने पाटोद्यात दुकान आहे. शाळा संपल्यानंतर आई ला दुकानात मदत करून देविकाने हे यश संपादन केले आहे.

पाटोद्यातील राजकारणी, व समाजसेवक म्हणून ओळख असलेले संदीप जाधव यांची देविका ही मोठी मुलगी. शांत, अभ्यासू काही तरी करून दाखवण्याची धमक अशी देविका ची पंचक्रोशीत ओळख आहे. देवीकाशी बोलताना तिचे अधिकारी होऊन देशसेवे साठी काही तरी करून दाखवण्याची जिद्द आहे. असे दिसून आले. या यशा मुळे देविकावर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# लातूर शहरात मान्सून पूर्व स्वच्छता मोहीमेसह, रस्त्याची डागडुजी करण्याची आम्ही लातूरकर युवक कृती समितीची मागणी

प्रतिनिधी @ लातुर

लातूर दिनांक १३.०५.२०२५ रोजी आम्ही लातूरकर युवक कृती समितीच्या शिष्ट मंडळाद्वारे

महानगरपालिका आयुक्त देविदास जाधव यांची भेट घेऊन

मान्सून पूर्व लातूर शहरात स्वच्छता मोहीमेसह, रस्ताची डागडुजी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

कचरा व पावसाच्या पाण्यामुळे अनेक गटारी, नाले तुंबले जाऊन शहरातील सकल भागातील रस्ते,वस्त्या मध्ये पाणी ,कचरा घुसतो त्यामुळे संसार उपयोगी साहित्याचे नुकसान व घराचे नुकसान झाल्याच्या अनेक घटना पूर्वी घडलेल्या आहेत

कालच्या अवकाळी पावसामुळे जूने जिल्हाधिकारी कार्यालय समोरील रस्ता, साळे गल्ली येथील वीर हनुमान रोड, तर पूर्व भागातील अंजली



नगर, इस्लामपूरा, बादाडे नगर आदी भागात पावसाचे पाणी घुसल्याने नागरिकांची तारांबळ उडाली असल्याने व असे अनुचित प्रकार घडू नये यासाठी महानगरपालिका प्रशासनाचे वतीने मान्सूनपुर्व शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात यावे तसेच बऱ्याचदा खड्यांचा अंदाज नआल्याने अपघात होतात त्यामुळे शहरातील रस्त्याची डागडुजी करण्याची मागणी करण्यात आली आहे यावेळी अँड प्रदिपसिंह गंगणे, श्री ताहेरभाई सौदागर, भीमराव दुनगावे, विनोद रणदिवे

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# शारदा इंग्लिश स्कूल केजचा इयत्ता दहावीचा सीबीएसई बोर्डपरीक्षेचा निकाल ९८.०५ टक्के

## शाळेतुन सर्व प्रथम येण्याचा मान कु.राऊत अरुषा ९६% तर सर्व द्वितीय कु.तिवारी जागृती ९५% तर तृतीय स्थान जाधव कृष्णा ९४% याने पटकावले

प्रतिनिधी @ केज

शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेचा मार्च २०२५ मध्ये झालेल्या इयत्तादहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेचा निकाल दिनांक १३ मे २०२५ रोजीदुपारी एक वाजता जाहीर झाला.शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून शाळेचानिकाल ९८.०५ टक्के लागलेला आहे. केज शहरामधील सीबीएसई बोर्डाची मान्यता असलेली ही एकमेव शाळा आहे.या शाळेने सातत्याने शाळेचे संस्थेचे, तालुक्याचे,जिल्ह्याचे नाव उंचावण्याचे काम केलेले आहे.चालू वर्षी ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी अटकेपार झेंडा रोवला आहे.प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी शाळेचा निकाल उत्कृष्ट लागला असून विद्यार्थी



व विद्यार्थिनींनी अतिशय चांगले गुण प्राप्त केले आहेत.शाळेमध्ये सर्व प्रथम येण्याचा मान कु राऊत अरुषा ९६% तर सर्व द्वितीय कु तिवारी जागृती ९५% तर तृतीय स्थान जाधव कृष्णा ९४ % याने पटकावले आहे.



शाळेमध्ये ९०% च्या पुढे गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १४ तर ८० ते ९०% च्या मध्ये ४६ विद्यार्थी आहेत.तसेच ७० ते ८०% मध्ये ५३ विद्यार्थी आहेत तर प्रथम श्रेणी मध्ये २५ व उत्तीर्णश्रेणी मध्ये १४विद्यार्थी आहेत इतक्या मोठ्याप्रमाणात यश मिळवले असल्याने शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव विद्यार्थ्यांवर होत आहे. वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना श्री.रमेशराव आडसकर यांनी हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, शिक्षकांच्या विद्यार्थ्या प्रती असलेल्या समर्पणाचे वपालकांच्या त्यागाचे असल्याचे मत मांडले.तसेचविद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाट चालीस हार्दिकशुभेच्छा दिल्या.शाळेच्या मार्गदर्शिका श्रीमती अर्चनाताई आडसकर यांच्या नियोजनाचे, मार्गदर्शनाचे हे यश असल्याचे मत शाळेचे प्राचार्य मिश्रा एस.एम व उपप्राचार्य सुरजसनी यांनी व्यक्त केले.तसेच विद्यार्थ्यांचे अभिनंदन सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

# माजी सभापती अशोक डक यांनी रामनगर तांड्यावरचा पाणी प्रश्न कायमचा मिटवला

प्रतिनिधी @ माजलगांव

तालुक्यातील छोटीवाडी जवळ असलेल्या रामनगर तांडा येथे सध्या पाणी प्रश्नपत्रिका झाला होता. मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक हे या ठिकाणी गेले या ठिकाणचा पाणी प्रस्थापित झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ या ठिकाणी बोर घेण्यास सांगितले व दुसऱ्या दिवशी या ठिकाणी बोअरवर मोटर टाकून संपूर्ण तांड्याचा बिकट झालेला पाणी प्रश्न सोडवला.

तालुक्यातील छोटेवाडी (रामनगर तांडा) येथील माजी सरपंच विनायकराव राठोड यांचे निधन झाले होते. त्यामुळे मुबंई कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती अशोक डक हे त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी गेले होते . यावेळी नागरिकात या ठिकाणी असलेले हातपंप बंद झाल्याने येथील पाणी प्रश्न गंभीर झाला असल्याचे त्यांच्या बोलण्यावरून लक्षात आले. त्यानंतर त्यांनी गावातील नागरिकांसोबत गावातील पाणी प्रश्नाबाबत चर्चा केली. असता अशोक डक यांनी ताबडतोब स्वखर्चाने बोर मशीन बोलावली व



या ठिकाणी तात्काळ बोअर घेतला. याला पाणी देखील भरपूर लागल्याने सोमवार रोजी अशोक डक यांनी बोअरची मोटार,पाईप,व त्यासाठी लागणारे सर्व साहित्य देऊन गावातील नागरिकांसाठी पिण्याचा पाण्याचा मिटवला. तांड्यावरील पिण्याचा पाणी प्रश्न सोडवल्यात बद्दल अशोक डक यांच्या हस्ते बोअरचे पूजन करण्यात आले व त्यांच्या हस्ते मोटार सुरू करून तांडयात पाणी सोडण्यात आले. रामनगर तांड्याचा पाणी प्रश्न सोडवल्यामुळे छोटेवाडी व रामनगर तांड्यावरील ग्रामस्थांनी अशोक डक यांचा सत्कार करून आभार मानले यावेळी छोटेवाडी गावचे सरपंच अंगदराव कटके,वैजनाथ कटके,देवींनाथ चव्हाण, अशोक माळेकर,लक्ष्मण चोरगे,महेश सोळंके,सतीश राठोड,वसंत राठोड,राहुल मापाडे,राजेश राठोड,आदी उपस्थित होते



# मोठेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सुभद्रा खेत्री यांची निवड

प्रतिनिधी @ माजलगांव

माजलगांव तालुक्यातील मोठेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी सुभद्रा अंगदराव खेत्री यांची सोमवारी बिनविरोध निवड करण्यात आली. मोठेवाडी ग्राम पंचायतीच्या सरपंच सत्यभामा मारोती दळवी ह्या अपात्र झाल्या मुळे त्यांच्या रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी सोमवारी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.यावेळी सरपंच पदासाठी सुभद्रा खेत्री यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी पारडकर व ग्राम विकास अधिकारी बिभीषण डोरेले यांनी सुभद्रा खेत्री यांची बिनविरोध निवड जाहीर केली.यावेळी माजी सरपंच अविनाश गोंडे, मा. चेअरमण अशोक पास्टे, राजाभाऊ पास्टे, अंगदराव खेत्री,दत्तात्रय चव्हाण, अशोक रासवे, शाम गिरी, आकाश रासवे, दत्तात्रय तपसे, राहुल सुरवसे,जालिंदर खेत्री,भगवान रोकडे, अॅड. पांडुरंग गोंडे, चक्रधर हिवरकर,गजानन गोंडे, संतोष खेत्री व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते सरपंच पदी निवड जाहीर झाल्या नंतर गावकऱ्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित सरपंच

# स्वामी विवेकानंद शाळेची १०० टक्के निकालासह उज्वल यशाची परंपरा कायम

प्रतिनिधी @ केज

जीवन विकास शिक्षण मंडळ संचलित,स्वामी विवेकानंद विद्या मंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेतील विद्यार्थ्यांनी मार्च२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी.बोर्ड परिक्षे मध्ये घवघवीत यश संपादन केले.या शाळेचे विद्यार्थी कु.चाटेसमीक्षा सचिन,सय्यद जोया फातेमा जुबेर चि.मुंडे सुरज भाऊराव या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० टक्के गुण संपादन करून शाळेतून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला.कु. डोईफोडे शालिनी प्रकाश,तांबारे वैष्णवी चंद्रशेखर,कदमशंभूराजे भागवतराव ९९.६० टक्के गुण मिळवून द्वितीय तर कु.शिंदे शाश्वती पुरुषोत्तम ९९.४० टक्के गुण मिळवून शाळेतुन तृतीय आली.या परीक्षेसएकूण २३३ विद्यार्थी बसले होते.तेंव्हा शाळेचा एकूण निकाल १०० टक्के लागला असुन विशेष प्राविण्यासह २२४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.प्रथम श्रेणीत ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळविणारे एकूण १२८ विद्यार्थी आहेत.शाळेतील ९८ टक्के पेक्षा अधिक गुण मिळविलेले विद्यार्थी-हरणमारे शाहिद सय्यद ९९.२०,भुसारे समीक्षा प्रचंड ९८.८०,चाटे प्रथमेश महादेव ९८.८०केदार ओमकारदत्तात्रय ९८.८०,कांबळे पूर्वी व्यंकट ९८.६०,गायके आकांक्षा रत्नाकर ९८.४०,सत्वधर हर्षा दत्ता ९८.४०,काटकर मानसी रामभाऊ९८.२०नेहरकर भक्ती विनायक ९८.२०,मुंडे श्रावणी अनिल ९८.२०,हिरवे प्रज्वल



बाबासाहेब ९८.००,काळे वेदिका वैजनाथ ९८.०० वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, उपाध्यक्ष नईमोद्दीन इनामदार,सचिव जी. बी.गदळे,सहसचिव उपेंद्र कोकीळ, कोषाध्यक्ष फजिलोद्दिन काजी,विलास जोशी, नारायण अण्णा अंधारे, संदीप इंगळे,शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा



शैलाताई इंगळे स्वयंअर्थ सहाय्यीत शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हनुमंत घाडगे, मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे,प्रा.वि चे मु.अ.वसंत शितोळे, प्राचार्य शंकर भैरट तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अक्षय मुंदडांना शुभेच्छा देण्यासाठी बंगल्यावर तुफान गर्दी

## पंतप्रधान सहाय्यता निधी, रक्तदान, बी-बियाणे वाटप, आंब्याचे रोप आदी कार्यक्रमाने वाढदिवस साजरा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी स्वत:चा वाढदिवस भारत-पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर साजरा करण्यास अनुमती दिली नसताना देखील विविध सामाजिक उपक्रम कार्यकर्त्यांनी साजरे करून संवेदना जपल्या. हार-तुरे स्विकारले नसले तरी शुभेच्छा देण्यासाठी केज मतदारसंघातुन तथा बीड जिल्ह्यातून हजारो कार्यकर्ते, मित्र परिवार, हितचिंतक प्रत्यक्ष बंगल्यावर येवुन गेले. एवढेच नव्हे तर सकाळपासून रात्रीपर्यंत तुफान गर्दी जमली होती. ७५ कार्यकर्त्यांनी रक्तदान केले तर पंतप्रधान सहाय्यता निधीला देखील सढळ हस्ते जीवाभावाच्या कार्यकर्त्यांनी मदत टाकून राष्ट्रीय कार्यात योगदान दिले. दरम्यान सेवाभाव हेच माझे मुळ तत्व असुन गोरगरिबांची सेवा आयुष्यभर करत रहाणार या शब्दांत अक्षय मुंदडा यांनी प्रतिक्रिया दिली. लेकरांचं कौतुक पहाण्यासाठी नंदकिशोर मुंदडा जातीने दिवसभर सभागृहात बसुन होते हे विशेष.

या मतदारसंघात अक्षय मुंदडा यांची विशेष क्रेज तथा सवंग लोकप्रियता किती दांडगी याचा अनुभव वाढदिवसाच्या निमित्ताने आला. खरं तर त्यांनी युद्धजन्य पार्श्वभुमीवर वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले नाही. मात्र जीवाभावाच्या कार्यकर्त्यांनी विविध सामाजिक उपक्रम घेतले होते. एकही हार-तुरे घेतला नसला तरी अक्षय मुंदडा मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन शिवाय मधुमेह तपासणी ठेवली होती. त्यात ७५ तरूण कार्यकर्त्यांनी रक्तदान केले तर मधुमेह तपासणीमध्ये ३२ रूग्ण निघाले. केज भाजपाच्या वतीने डॉ.वासुदेव नेहरकर आणि भगवान केदार यांनी अभिनव उपक्रम घेत वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देताना केशर आंबा रोप वाटप कार्यकर्त्यांना केले. शहराच्या बांधकाम व्यवसायातील केएसबील ग्रुपच्या वतीने




आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या कुटुंबाला बियाणे व खताचे पोते स्वत: अक्षय मुंदडा यांच्या उपस्थितीत नगर परिषद सभागृहात वाटप करण्यात आले. वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले नसताना देखील संपुर्ण मतदारसंघातील कानाकोपर्यामधुन सरपंच, चेअरमन, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर शुभेच्छा देण्यासाठी अक्षय बंगल्यावर उपस्थित राहिले. पंतप्रधान सहाय्यता निधीला मदत देण्याचे आवाहन केल्यानंतर सभागृहात ठेवलेल्या पेटीत योगदान देण्यासाठी कार्यकर्त्यांच्या रांगा लागल्या. शक्य तेवढे योगदान अनेकांनी पुढे येवुन दिले. एखादा तरूण राजकारणी सामाजिक संवेदना जोपासत जेव्हा राजकारण करतो त्यावेळी समाजातील इतर तरूण देखील आदर्श घेतल्याशिवाय रहात नाहीत. वर्तमान काळात वाढदिवस म्हटलं की हार-तुरे, केक, शाल असं स्वरूप असतं. मात्र या तरूण नेतृत्वाने वाढदिवसानिमित्त प्रत्यक्ष कृतीतून दाखवुन दिलेला साधेपणा कौतुकाचा विषय ठरला. जीवाभावाचे कार्यकर्ते जेव्हा शुभेच्छा देण्यासाठी येत होते, प्रत्येकाची आस्थेवाईक चौकशी करत थोरामोठ्यांचे आशिर्वाद घेत त्यांनी स्वभावातली नम्रता देखील मनं जिंकुन घेणारीच ठरली. विविध ठिकाणचे कार्यक्रम तथा दिवसभर बंगल्यावर उपस्थित राहिलेल्या लेकराला शुभेच्छा देण्यासाठी येणार्यांची गर्दी पाहुन नंदकिशोर मुंदडा यांना देखील गहिवरून आले. दरम्यान, बंगल्यावर सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्र परिवार, हितचिंतक मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेताना दिसले.

मंत्री पंकजाताईकडून शुभेच्छा....

राज्याच्या पर्यावरण, पशु संवर्धन, कॅबीनेट मंत्री ना.पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांनी भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. जिल्ह्याच्या माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदार, पक्षाचे प्रमुख पदाधिकारी शिवाय इतर लोकप्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शुभेच्छा दिल्या. दरम्यान, ताईसाहेबांच्या शुभेच्छा माझ्यासाठी फार मोठा आशिर्वाद असुन सर्वात अगोदर सकाळी त्यांचा फोन येणे तेच खरे माझे भाग्य असल्याचे त्यांनी सांगितले. गोरगरिबांची सेवा हीच मला आई-वडिलांची शिकवण तो सेवाभाव आयुष्यभर जपुनच भविष्यात या मतदारसंघाची सेवा करणार, आगामी काळात विकासाचा संकल्प हेच आपले ध्येय रहाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# निगमानंद विद्यालयाचा दहावीचा ९८ टक्के निकाल

प्रतिनिधी @ मानुर

शिरूर तालुक्यातील श्रीक्षेत्र संस्थान मच्छिंद्रगड संचलित निगमानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने यंदाही आपल्या उज्वल परंपरेत भर घालत दहावीच्या शालांत परीक्षेत ९८ टक्के निकालाची घौडदौड कायम ठेवली आहे.या यशस्वी निकालात श्रद्धा सुरेश माने हिने ९५.२० टक्के घेऊन प्रथम क्रमांक मिळवत शाळेत अव्वल स्थान पटकावले आहे. तिच्यानंतर सिद्धार्थ वाघमारे ने ९४ .२० टक्के घेऊन दुसऱ्या क्रमांकावर, तर वैष्णवी कातकडे हिने ९३.२० टक्के घेऊन तिसरे स्थान मिळवले आहे.

शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष महंत जनार्दन महाराज,



सचिव के. एम. काळे, मुख्याध्यापक ए. एम. घरगिने, संचालक,पत्रकार चंद्रकांत राजहंस, गोरख खेडकर, डिगांबर गायकवाड सह प्राध्यापक व शिक्षक-कर्मचारीवर्ग यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

# कन्या प्रशालेची दहावी बोर्ड परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम

आष्टी (प्रतिनिधी)

एस. एस. सी. बोर्ड परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, जि. बीड चा निकाल शंभर टक्के लागला असून शाळेने यशाची परंपरा कायम ठेवली आहे.गुणवंत विद्यार्थीनी पुढीलप्रमाणे - कु. टाक रिद्धी भगवान ९६.४० %(प्रथम क्रमांक), कु. केरुळकर ज्ञानेश्वरी श्याम ९५.८० % (द्वितीय क्रमांक), कु. पालवे वैष्णवी किरण ९४.४० % (तृतीय क्रमांक), कु. केरुळकर मीरा पोथीराम ९३.८० %, कु. खाडे मयुरी भीमराव ९३.६० %, कु. लोणकर वैष्णवी प्रवीण ९३.६० %, कु. तवले स्नेहल मदन ९२.४० %, कु. करांडे श्रेया अशोक ९१.६० %, कु. पठाण सानिया राजूखान ९१.६० %, कु. तवले प्रियंका विजयकुमार ९१.२० %,

## प्रशालेचा निकाल शंभर टक्के




कु. केरुळकर धनश्री अशोक ९१.०० % आदींनी चांगले गुण घेवून यश संपादन केले आहे.

सर्व उत्तीर्ण, गुणवंत विद्यार्थिनींचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा, उपाध्यक्षा व सर्व सदस्या तसेच शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम



प्रतिनिधी @ बीड

बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि. १३) रोजी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहरातील नालेसफाई, रस्त्यांची स्वच्छता, आणि पाण्याचा निचरा यासंबंधी सविस्तर चर्चा झाली. आ. क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांना मान्सूनापूर्वी सर्व नाल्यांची साफसफाई पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्याचे निर्देश दिले. बीडकरांना पावसाळ्यातील समस्यांना सामोरे जावे लागू नये, यासाठी नियोजनबद्ध काम करणे गरजेचे आहे,असे आ.संदीप क्षीरसागरांनी यावेळी सांगितले. येत्या १० ते १२ दिवसांमध्ये शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम पूर्ण करण्याचे नियोजन करून स्वच्छता मोहीम युध्दपातळीवर राबविण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी नगरपालिकेला दिले आहेत.

# पती-पत्नीतील मधुर नात्याचा ‘पुष्पवेध’!

आष्टी (प्रतिनिधी)

पती - पत्नीतील नात्यांची गाठ ही स्वर्गात बांधली जाते असे म्हटले जाते. मनुष्य जीवन सर्वांग सुंदर आहे. मानवी जीवनात १६ संस्कार आहेत. त्यापैकी विवाह हा संस्कार आहे. परिपूर्णतेसाठी या संस्कारातूनच यशस्वी जीवनाची सुरुवात होते. आयुष्यभर एकत्र आणि सोबत राहून या जीवनातील कर्तव्य, शीलता, सामाजिक बांधिलकी, आनंद नैतिकता चारित्र्य तसेच इतरांसाठी जगण्याची ऊर्जा बळ शक्ती समवेतच संवेदनशीलता ही मूल्य जपून करावी लागते. अशाच एका उत्तम जोडप्याचा वास्तव नमुना आष्टीतील पत्रकारिता क्षेत्रातील एका लढवय्या व्यक्तिमत्त्वाच्या अनुषंगाने दृष्टीक्षेपात पडला! आपल्या वैवाहिक जीवनाला ३० हून अधिक वर्ष झाल्यानंतर सुद्धा त्यातील गोडवा, मधुरता, जिवलगपणा, लाडीवाळपणा, प्रेम जिव्हाळा, अस्था, माया कायम.



तितकीच किंबहुना अधिक दृढ आणि मजबूत करून मुलांना योग्य संस्कार करत शिक्षण संस्कृती आणि लेखणीच्या माध्यमातून ती पुढे नेण्यात आनंद मानणारी ही जोडी आहे. त्या जोडीचे नाव आहे - वरिष्ठ पत्रकार उत्तम बोडखे आणि त्यांच्या पत्नी शिक्षिका सौ. बबीताताई उत्तम बोडखे!


सातत्याने हसतमुख राहून कर्तव्यशीलता जपणारी ही जोडी! वयाच्या चौपन्नी नंतरही आणि विवाहाच्या ३० व्या. वर्षानंतर तितकीच सुखद, देशाच्या कानाकोपऱ्यात ऐतिहासिक धार्मिक स्थळांना भेटी देत मनसोक्त भ्रमण करणारी... हसतमुख रसाळ वाणी... आणि सदैव सकारात्मक राहून प्रेरणा देणारी ठरेल यात शंका नाही.

## ९४ टक्के गुण मिळवत अलिशा जावेद पठाण चे दहावीत घवघवीत यश

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी येथील पत्रकार जावेद पठाण यांची कन्या अलिशा जावेद पठाण हिने माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र परीक्षा (दहावी) च्या परिक्षेत ९४ % गुणाने उत्तीर्ण होत दहावीत घवघवीत यश मिळवले आहे.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी - मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (डडउ) परीक्षेत परळी वैजनाथ येथील फाउंडेशन स्कूलच्या विद्यार्थिनी कु. अलिशा जावेद पठाण हिने ९४ % गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.

अलीशा च्या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे. ती लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार आहे. तिच्या या यशामागे तिची चिकाटी, मेहनत, पालकांचे मार्गदर्शन व



शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे तिने सांगितले. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत असून सर्व पत्रकार, सामाजिक, राजकीय, शैक्षणीक स्तरातून तिचे अभिनंदन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक सह सर्व शिक्षक वृंदांनी तीचे अभिनंदन करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# महाराष्ट्र विद्यालयाचा एस.एस.सी परीक्षेत दैदीप्यमान यश

## माध्यमिक विभागाचा ९६.०३% निकाल

परळी / प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र शिक्षण संस्था, मोहा संचलित महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाने एस.एस.सी. (सन २०२५) परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालामध्ये विद्यालयाच्या माध्यमिक विभागाने तब्बल ९६.०३% चा विक्रमी निकाल नोंदवला आहे.

कॉपीमुक्त वातावरणातही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या संस्थेच्या ध्येयाला या निकालाने अधिक बळ दिले आहे. महाराष्ट्र विद्यालय, मोहा या संस्थेने यापूर्वीही विविध स्पर्धा परीक्षा आणि बोर्ड परीक्षांमध्ये आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे, याची पुन्हा एकदा



प्रचिती आली आहे.या बोर्ड परीक्षेत कु. देशमुख प्रांजली प्रमोद हिने ९२.८०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, तर चि. देशमुख शौर्य सुधीर याने ९२.२०% गुणांसह द्वितीय आणि चि. मुंडलिक निखिल पुरुषोत्तम याने ९१.८०% गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. विशेष म्हणजे, विद्यालयातील तब्बल ४६ विद्यार्थ्यांनी ८५% पेक्षा अधिक गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे सचिव, तसेच संचालक मंडळाने विद्यालयाचे प्राचार्य, उच्च माध्यमिक विभागाचे प्रमुख, सर्व शिक्षक आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. संस्थेने या विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## स्वामी विवेकानंद विद्यालयाचा निकाल ९४. ४४ टक्के

प्रतिनिधी @ माजलगांव


शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९४. ४४ टक्के लागला आहे. विद्यालयातुन ३० विद्यार्थी विशेष प्राविण्यामध्ये उत्तीर्ण झाले आहेत. नाटकर शेजल तुळशिराम हिने ९६.४०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला आहे, राऊत शिवम नारायण ९४.२०% व्दितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक गायके विशाल दिगांबर - ९४ % गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. शिंदे ऋतूजा गोवर्धन ९२.४०% व दुधाळ अनुष्का अनिल ९०.६०% यांनी यश मिळविले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मोहन जगताप, सचिव राहुल जगताप, मुख्याध्यापक लक्ष्मण जगताप, मुख्याध्यापक सुधाकर करांडे व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# ह.भ.प.कै.आश्रुबा दादा गायकवाड यांच्या कृपा आशिर्वादा मुळेच किर्तनकार झालो ह.भ.प.महादेव महाराज पुरी

प्रतिनिधी @ केज

२० व्या शतकातील महान विभूती ह.भ.प. कै.आश्रुबा दादा गायकवाड,आनंदगांव यांच्या कृपा आशिर्वादा मुळेच मी किर्तनकार झालो आणि माझे भाग्य थोर की,ह.भ.प. आश्रुबा दादा गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त मला किर्तनसेवा करण्याची मला संधी मिळाली असे मत किर्तन सेवा करताना किर्तनकार ह.भ.प. महादेव महाराज पुरी यांनी किर्तनरुपी सेवा करताना व्यक्त केले.

दिनांक १३ मे २०२५ रोजीह.भ.प.कै.आश्रुबा दादा गायकवाड यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त किर्तन करताना ते बोलत होते.संपूर्ण महाराष्ट्रात दादामहाराज म्हणून त्यांचे नाव होते. निशुल्क किर्तन सेवेतून आपली वेगळी ओळख कै.आश्रुबा दादा गायकवाड यांनीनिर्माण केली.अमाप आणि अफाट शब्द सामर्थ्य व ओघवती भाषा हे त्यांच्या किर्तन सेवेचे एक वैशिष्ट्य होते.



१९७२ पर्यंत त्यांनी अखंड आणि अविरत किर्तन सेवा केली. संस्कृत,मराठी,हिंदी, इंग्लिश,उर्दू,मोडी,पाली अशा ७ भाषा त्यांनी आत्मसात केल्या होत्या जसा जनसमुदाय तशी भाषा हे त्यांच्या किर्तन सेवेचे दुसरे वैशिष्टे होते.दादांनी ग्रंथ वाचन,अर्थ सांगणे,प्रवचन करणे, किर्तन करणे हे अध्यात्मिक कार्य करीत असतानाच महिला भजनी मंडळ ही संकल्पना २० व्या शतकात गांवापासून सुरू केली व महाराष्ट्र भर पसरविली.जगदगुरु संत तुकाराम महाराजां सारखे वैराग्य धारण केले.आधी संसार करावा नेटका हे ब्रीद त्यांनी आयुष्यभर तंतोतंतपाळले.अवघाची संसार सुखाचा करीन,आनंदे भरीन तिन्ही लोक याची प्रचिती त्यांनी दिली.दादांच्या प्रथम पुण्य स्मरणानिमित्त आयोजित किर्तनाला व इतरही कार्यक्रमात ग्रामस्थ,पंचक्रोशीतील महिला पुरुष व महाराष्ट्रातूनही अध्यात्म क्षेत्रातील मंडळींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लोकमान्य टिळक विद्यालयाची इ.१० निकालाची उज्वल परंपरा कायम

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई संचलित लोकमान्य टिळक विद्यालय,पोखरीचा शैक्षणिक वर्ष २०२४- २५ या वर्षात माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेत (इ.१०वी बोर्ड) विद्यालयाचा ८५.९६%निकाल लागला आहे. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी ग्रामीण भागातील या विद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.सदरील परीक्षेत विद्यालयातील ५७ विद्यार्थ्यांपैकी ०७ विद्यार्थी विशेष प्राविण्य,१७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत,०९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

यंदाच्या निकालात मुलींनी विशेष बाजी मारत यश संपादन केले आहे.

विद्यालयातील गुणानुक्रमे ७५% पेक्षा अधिक गुण घेणारे विद्यार्थी :- १) कु.वैष्णवी उद्धव गुळवे - ८६.८०% - ४३४ गुण२) कु-निशिगंधा ज्ञानोबा निकम ८६.४०% - ४३२ गुण३) कु.अक्षता श्रीहरी थोरात - ८४.२०% - ४२१गुण४) कु.सुप्रिया मोहन साळवे- ८३.००% - ४१५ गुण५) कु.प्रीती रामलिंग वाघमारे - ८१.८०% - ४०९ गुण६) कु.अक्षता सुंदरराव साळुंखे- ७९.६०%- ३९८ गुण ७) कु.प्रिया रामलिंग वाघमारे- ७५.८०%- ३७९ गुण तसेच यावर्षी अनेक विद्यार्थ्यांनी मराठी,इंग्रजी, विज्ञान आणि सामाजिक शास्त्र या विषयात ९० पेक्षा अधिक गुण मिळवत यश संपादन केले आहे.

विद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे भा.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.श्री.सुरेंद्रजी आलूरकर,मा.कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांतराव मुळे,समस्त संस्था पदाधिकारी तसेच अंबाजोगाईचे स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष श्री.विजयराव वालवडकर,कार्यवाह श्री.किरणदादा कोदरकर, विद्यालयाचे शालेय समितीचे अध्यक्ष श्री.आप्पाराव यादव,विद्यालयाच्या पालक डॉ.सौ.कल्पनाताई चौसाळकर,पोखरीचे सरपंच श्री.श्रीहरीबप्पा होळकर,विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.संजयराव विभूते,१०वी प्रमुख श्री.विष्णू तेलंगे आणि सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी,पोखरीतील सर्व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

# गाळ माफियांचा नंगानाच विना नंबरच्या टिप्परने शेतकऱ्यास उडवण्याचा प्रयत्न

## जिल्हाधिकारी साहेब गाळ माफियाला कधी आवर घालणार

वडवणी/प्रतिनिधी

धुनकवाड येथील कुंडलिका धरणातुन अवैध गाळ उपसा चालु गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असुन हा गाळ उपसा माजलगावचे उपविभागीय अधिकारी व धारुरचे तहसीलदार यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याने महसूल प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी मुग गिळुन गप्प बसत आहेत.

काल दि.१२मे सोमवार रोजी कारी फाटा येथे पाऊस चालू असल्याने कारी येथील शेतकरी नितिन मोरे हे रस्त्याच्या कडेने चालत असताना गाळ माफियांच्या विना नंबरच्या टिप्परने या शेतकऱ्यांस उडवण्याचा प्रयत्न केला हा गाळ माफियांचा नंगानाच सुरू असुन संतप्त ग्रामस्थांनी टिप्पर अडवून पोलीस अधीक्षकांना फोन करून माहिती




दिली.तरी आता महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन या टिप्पर वर काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यावेळी विना नंबरचे टिप्पर संतप्त ग्रामस्थांनी अडवून ठेवले परंतु महसूल प्रशासनाचा व पोलीस प्रशासनाचा एकही कर्मचारी देखील याकडे फिरकला नाही. यावरूनच दिसून येते की महसूल प्रशासनाचे व पोलीस प्रशासनाचे कर्मचारी व अवैध गाळ उपसा करणारे गाळ माफियांचे किती लागेबांधे आहेत यावरून दिसून येते.

माजलगाव उपविभागीय अधिकारी व धारूर तहसीलदारांच्या आशिर्वादाने सर्रास कुंडलिका धरणातुन गाळ उपसा करत वीटभट्टी चालकांना विक्री केला जात आहे.यावर अनेक शेतकऱ्यांनी आवाज उठवून ही धारूर तहसीलदार काहीच कारवाई करत नसल्याने धारूर तहसील प्रशासनाच्या विरोधात ही शेतकऱ्यांत तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.

धुनकवाड येथील कुंडलिका धरणातील शासनाने भूसंपादित केलेल्या जमिनीवरील अवैध गाळ उपसा हा मोठ्या प्रमाणात सुरू असून हा गाळ शेतकऱ्यांना न देता हा गाळ वीटभट्टी धारकांना विकला जात असून गाळ उपशासाठी तालुका प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी व गाळमाफिया यांचे संगणमत असून कोट्यावधी रुपयांच्या गाळासाठी लाखो रुपयांची डिल झाले असल्याची चर्चा नागरिकांत होत आहे. यामुळेच महसूल प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष आहे.

जिल्हाधिकारी साहेब या गाळ माफियाला कधी आवर घालणार असा संतप्त सवाल शेतकरी करत आहेत तर महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन या विना नंबरच्या टिप्परवर काय कारवाई करणार का काही तरी ओले हात करून असेच सोडुन देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मंठा येथील कु. खुशी मानधने हिचा तालुक्यात दहावी परीक्षेत ९९% गुणांसह प्रथम क्रमांक - वैद्यकीय सेवेत असलेल्या कुटुंबाची यशस्वी परंपरा पुढे नेत गौरव

डॉ आशिष तिवारी/मंठा - मंठा तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात एक अत्यंत आनंदाची आणि अभिमानास्पद बातमी! मंठा येथील डॉ. नितीन आणि सौ. सविता मानधने यांची कन्या कु. खुशी नितीन मानधने हिने दहावीच्या परीक्षेत तब्बल ९९% गुण मिळवत सेलू तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उज्वल यशामुळे संपूर्ण मंठा तालुका आनंदित झाला आहे.

खुशी हीने आपले शिक्षण सेलू येथील डॉक्टर रोडगे यांची प्रिन्स इंग्लिश स्कूल येथे पूर्ण केले असून, अत्यंत अभ्यासू आणि शिस्तबद्ध वृत्तीने तिने शिक्षण घेतले. तिच्या मेहनतीचा आणि तिच्या कुटुंबीयांच्या प्रोत्साहनाचा हे फलित आहे.

खुशीचे वडील डॉ. नितीन मानधने आणि आई सौ. सविता मानधने हे दोघेही मंठा येथील वैद्यकीय क्षेत्रात गेल्या ३०-३५ वर्षांपासून रुग्णसेवेत कार्यरत आहेत. या सेवाभावी कुटुंबातील मुलगी म्हणून खुशीने केवळ आपल्या कुटुंबाचे नव्हे तर संपूर्ण परिसराचे नाव उज्वल केले आहे.

खुशी हिचे स्वप्न भविष्यात वैद्यकीय शिक्षण घेऊन समाजसेवेत योगदान देण्याचे आहे. तिच्या या यशामुळे शाळेतील शिक्षक, ग्रामस्थ, नातेवाईक आणि मित्रपरिवारातून तिच्यावरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मेहनत, शिस्त आणि ध्येयवेड हे यशाचे मूलमंत्र आहेत. हे यश केवळ



सुरुवात आहे, पुढे आणखी मोठी उंची गाठायची आहे, असे भावनिक उद्गार खुशीने यशानंतर व्यक्त केले.

तिच्या या घवघवीत यशाबद्दल तिचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

तुझ्या यशाचा मंठा शहराला आणि आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे!

# दहावीच्या परिक्षेत इमरान महेताब शेखने मिळविले ९३.२० टक्के

गुरूदेव विद्यामंदीर माध्यमिक विद्यालयातुन प्रथम येण्याचा बहुमान.

मुखेड / प्रतिनिधी.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परिक्षेचा निकाल दि.१३ मे रोजी दुपारी ०१ वाजता जाहीर झाला.या निकालात मुखेड शहरातील गुरूदेव विद्या मंदिर माध्यमिक विध्यालयाचा विद्यार्थी इमरान महेताब शेख याने ९३.२० टक्के गुण मिळवून नेत्रदीपक यश संपादन करीत गुरूदेव विद्या मंदिर माध्यमिक विध्यालयातुन प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे या यशाबद्दल इमरानचे सर्वस्तरातुन कौतुक व अभिनंदन होत आहे.

नुकतच दिनांक १३ में रोजी दहावीच्या परिक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने परिक्षा मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर झाला त्यामध्ये शहरातील गुरूदेव विद्यामंदीर विद्यालयाचा विद्यार्थी व राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेचे नांदेड जिल्हाध्यक्ष महेताब शेख यांचे चिरंजीव इमरान महेताब शेख या विद्यार्थ्याने परिक्षेच्या निकालात घवघवीत यश संपादन करीत ९३.२० टक्के गुण मिळविले आहे.यात त्याला मराठी विषयात ८२,हिंदी विषयात ८७, इग्लिंश ७५, गणित ९४, विज्ञान आणी तंत्रज्ञान ९३ व सामाजिकशास्त्रे १०० गुण मिळाले आहेत.इमरानने या यशाचे सर्व श्रेय शिक्षक, शिक्षिका,आजी,आई,वडील व मार्गदर्शन करणाऱ्या सर्वच गुरुजणांना दिले आहे.या यशाबद्दल आमदार डॉ.तुषार राठोड,माजी आ.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर,माजी आमदार अविनाश घाटे,माजी आमदार सुभाष साबणे,माजी नगराध्यक्ष गंगाधर राठोड,माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर,माजी जि.प.सदस्य दशरथराव लोहबंदे, प.स.चे माजी उपसभापती सुभाष पाटील दापकेकर, माजी जि.प.सदस्य संतोष बोनलेवाड, गटविकास अधिकारी सि.एल.रामोड,गटशिक्षण अधिकारी कैलास होनधरणे, नांदेड जिल्हा मराठी



पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे,माजी नगरसेवक राहुल लोहबंदे, भाजपाचे तालुकाध्यक्ष बालाजी पा.सकनुरकर,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजु पाटील रावणगावकर,काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राजन देशपांडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बाबुराव कदम,भाजपा शहर मंडळ अध्यक्ष नागनाथ लोखंडे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष अशोकराव गजलवाड,शिक्षण विस्तार अधिकारी डॉ.शिवाजी कराळे,शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजीराव येवतीकर,शिक्षण विस्तार अधिकारी उत्तम चव्हाण, गुरूदेव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजीव गरुडकर,उपाध्यक्ष संजय गरुडकर,कोषाध्यक्ष डॉ.बालाजी गरुडकर, मुख्याध्यापक बालाजी येवते,राष्ट्रीय अल्पसंख्याक परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आब्दुल बशीर माजीद, तालुकाध्यक्ष असद बल्खी, डोरनाळीचे सरपंच प्र.हुल्लाजी पाटील शिंदे,उपसरपंच प्र.प्रकाश पा.शिंदे,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शिवशंकर पाटील कलबंरकर,राष्ट्रवादीचे जयभिम सोनकांबळे,प्रा.डॉ.संतोष मंगनाळे,दिलीप चव्हाण,विकास राजुरकर,गजानन ढगे सह सर्व पत्रकार संघाचे अध्यक्ष, सचिव, उपाध्यक्ष,पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी इमरानचे कौतुक करुन अभिनंदन केले आहे.



छाया-उत्तम बोरसुरीकर

# जमजम कॉलनीत घराला आग, संसार उपयोगी साहित्य जळून खाक

परभणी (प्रतिनिधी): शहरातील कौडगाव रोडवरील जमजम कॉलनीत एका घराला पहाटेच्या सुमारास आग लागून घरातील संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना मंगळवार दि १३ रोजी पहाटेच्या सुमारास घडली. अग्निशामक दलाने वेळीच ही आग आटोक्यात आणल्याने अनर्थ टळला.

परभणी शहरातील जमजम कॉलनी येथील शेख इनुस शेख सुलतान यांच्या घराला मंगळवारी पहाटे तीनच्या सुमारास आग लागली. पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केले. तात्काळ या घटनेची माहिती अग्निशामक दलाला सरवर शेख यांनी दिली. अग्निशामक दलाच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी जात आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत घरातील संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले होते.. दरम्यान अग्निशामक जवान उमेश कदम, निखिल बेंडसुरे, वाहन चालक वसीम अखिल अहमद यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले.